cmyk

## संपादकीय

### शिंदे यांची डाळ शिजणार नाहीच...!

भाजप नेतृत्वाने मुख्यमंत्री कुणाला करायचे हा निर्णय अजून घेतलेला दिसत नाही. आपले मुख्यमंत्रिपद वाचवण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दौऱ्यात शेवटचा प्रयत्न केल्याचे बोलले जाते. अर्थात त्या प्रयत्नांना यश येणार नव्हतेच. किमान मुख्यमंत्री पदाच्या मोबदल्यात काही वजनदार खाती आपल्या पक्षाला मिळावी असा प्रयत्न शिंदे यांनी केला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कदाचित त्या प्रयत्नांनाही म्हणावे तसे यश मिळाले नसल्याचे दिसते आहे. पण शिंदे यांच्या हातात काहीच नाही त्यामुळे ते रूसले काय अन् इतर काही नाटके केली काय त्याची डाळ शिजणार नाहीच हे स्वच्छ आणि स्पष्ट आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### बांगलादेशमधील हिंदूंच्या सुरक्षेसाठी जगभरातील इस्कॉन मंदिरामध्ये विशेष प्रार्थना

नवी दिल्ली : बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू, बौद्ध आणि जैन समाजावरील हल्ले सुरुच आहेत. या हल्ल्यांविरोधात आवाज उठवणाऱ्यांनाही टार्गेट केले जात आहे. चिन्मय कृष्ण दास प्रभू यांच्यासह इस्कॉनशी संबंधित चार पुजाऱ्यांनाही बांगलादेश सरकारने अटक केली आहे. हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ आणि त्यांच्या सुरक्षेसाठी रविवारी (दि.१) जगभरातील इस्कॉन मंदिरांमध्ये विशेष प्रार्थनांचे आयोजन करण्यात आले होते. बांगलादेशच्या मुद्द्यावर इस्कॉनच्या प्रशासकीय समितीचे आयुक्त गौरांग दास म्हणाले, आम्ही दर रविवारी कीर्तन आयोजित करतो. कीर्तनचे आयोजन बांगलादेशातील सर्व भाविक आणि हिंदू अल्पसंख्याकांच्या सुरक्षेसाठी केले गेले.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२२० | सोमवार, दि.०२ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# ज्वारीचा पीकविमा भरण्यास मुदतवाढ द्या!

## शेतकऱ्यांची मागणी, स्वाभीमानी संघटनेनेही दिला पाठिंबा

**पुणे । प्रतिनिधी**

**प्रधानमंत्री फसल बीमा योजना अंतर्गत यंदाच्या रब्बी हंगामात ज्वारी पिकाचा विमा भरण्यासाठी दिलेली मुदत तोकडी असल्यामुळे बहुतांश शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहिल्यामुळे गहू, हरभराला दिलेल्या मुदतवाढीप्रमाणे ज्वारी पिकासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. दुसरीकडे या मागणीला स्वाभिमानी शेतकरी संघटनेनेही पाठिंबा देत मुदतवाढीची मागणी केली आहे.**

खरीप हंगामात बाजरी, तूर, मका, कांदा, भुईमुग ही पिके घेतली जातात तर रब्बी हंगामात ज्वारी, हरभरा, गहू ,उन्हाळी कांदा, भुईमूग, पिके घेतली जातात. यंदा पडलेल्या पावसामुळे विहिरीत पाणीसाठा उपलब्ध आहे. त्या जोरावर शेतकऱ्यांनी रब्बी पिकाची पेरणी चांगल्या पद्धतीने केली आहे. मात्र या पिकाचे पाऊस,अवकाळी,इतर नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाने पीक विमा योजना जाहीर केली आहे. रब्बी पिकासाठी ही मुदत ३० नोव्हेंबर होती मात्र याच हंगामातील गहू आणि हरभरा या पिकासाठी १५ डिसेंबर पर्यंत



मुदतवाढ नुकतीच दिली आहे. मात्र ज्वारी पिकांला कसलीच मुदतवाढ शासनाने दिली नाही. सोलापूर पट्ट्यासह मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात ज्वारीची लागवड केली जाते. यंदाही शेतकऱ्यांनी ज्वारीची पेरणी केली आहे. मात्र विमा भरण्याची मुदत ३० नोव्हेंबर रोजी संपली आहे. शासनाने गहू आणि हरभार या पिकांसाठी विमा मुदतवाढ देताना नवीन तारिख १५ डिसेंबर केली आहे. मात्र यात ज्वारी पिकाचा समावेश करण्यात आलेला नाही. अनेक शेतकऱ्यांचा विमा राहिला असून, ज्वारीसाठी विमा भरण्याची मुदतवाढ देण्याची आवश्यकता आहे. नोव्हेंबर महिन्यात निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रशासन व्यस्त असल्याने त्याबाबत जनजागृती करता आली नाही त्यामुळे अनेक शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहिले. तर सध्या विरोधी पक्ष पराभवाचे चिंतन करण्यात तर सत्ताधारी सत्ता स्थापनेत व्यस्त असलेल्या राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांकडे लक्ष द्यावे, अशी मागणी करीत स्वाभिमानी या शेतकरी संघटनेकडूनही ज्वारीसाठी पीकविमा भरण्याची मुदत वाढवावी, अशी मागणी केली आहे.

## दिल्ली विधानसाभा स्वबळावर लढवणार–केजरीवाल

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



नुकत्याच झारखंड आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. यानंतर आता आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु झाली आहे. आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. दिल्लीतील सत्ताधारी आम आदमी पक्षानेही (आप) जोरदार तयारी केली आहे. अशातच आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसंदर्भात मोठे वक्तव्य केले आहे. आम्ही कोणतीही आघाडी करणार नाही. दिल्लीतील सर्व जागांवर आप स्वबळावर निवडणूक लढवणार आहे असे दिल्ली विधानसभा निवडणुकीतील आघाडीबाबत अरविंद केजरीवाल यांनी म्हटले आहे. याचबरोबर, अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील सर्व विधानसभा मतदारसंघात परिवर्तन यात्रा काढण्याच्या भाजपच्या निर्णयावरही भाष्य केले. ते म्हणाले, भाजपला परिवर्तन यात्रा काढू द्या.

पान २ वर

# सत्ता स्थापनेचा दावा न करताच शपथविधीचा कार्यक्रम

## संजय राऊत यांचा खोचक सवाल, बावनकुळे राज्यपाल आहेत का?

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील संशयातीत बहुमत मिळविणाऱ्या महायुतीकडून अद्याप सत्ता स्थापनेचा दावा करण्यात आलेला नाही किंवा मुख्यमंत्री पदासाठी अधिकृत नावाची घोषणा केलेली नसतानाच भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ५ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत महायुती सरकारचा शपथविधी सोहळा होणार असल्याची घोषणा शनिवारी संध्याकाळी केली. त्यावरून शिवसेना उबाठा गटाचे खासदार तथा प्रवक्ते संजय राऊत यांनी**





**चंद्रशेखर बावनकुळे यांना खोचक सवाल करत बावनकुळे राज्यपाल आहेत का की राज्यपालांनी तसे बावनकुळे यांना सांगितले आहे, असा खोचक सवाल केला आहे. अजून सत्ता स्थापनेचा दावा केलेला नसताना थेट शपथविधीचा कार्यक्रम कसा काय जाहिर करू शकतात असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.**

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले की, पाच तारखेला शपथविधी होईल हे सांगायला चंद्रशेखर बावनकुळे हे काय राज्यपाल आहे का ? त्यांना कार्यक्रम जाहिर करण्याचा अधिकार कोणी दिला. की राज्यपालांनी त्यांना सांगितले आहे का अशी प्रश्नांची सरबती करत एकीकडे हे महायुतीवाले सत्ता स्थापनेचा दावा करायला तयार नाहीत. तर दुसऱ्याबाजूला बावनकुळे पाच तारखेला शपथविधी असल्याचे जाहिर करून मोकळे झाले आहेत. राज्यात खूप गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यघटनेचा मोठा पेचप्रसंग निर्माण झाला आहे. या सगळ्याला माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड जबाबदार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना ते म्हणाले की, राज्याचे काळजीवाहू

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आजारपणामुळे त्यांच्या दरे या गावी गेल्याचे

पान २ वर

## राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या गटनेते पदी जितेंद्र आव्हाड

**मुंबई । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची रविवारी बैठक झाली. या बैठकीत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पक्षाच्या गटनेते पदी मुंब्र्याचे आमदार जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आल्याचे जाहिर केले. तर आर आर पाटील यांचे चिरंजीव तसेच राज्याच्या विधानसभेत पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडूण आलेले रोहित पाटील यांची पक्षाच्या मुख्य प्रतोद पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच**



**नव्याने निवडूण आलेले माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांचीही प्रतोद पदी निवड करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.**

राज्यातील विधानसभा निवडणूकीत महायुतीने संशयातीत जागा मिळवित बहुमतापेक्षाही जास्त जागा जिंकल्या. तर महाविकास आघाडीतील घटक पक्षांना अवघ्या ४९ जागांवर समाधान मानावे लागले. या पार्श्वभूमी महाविकास आघाडीला विधिसभेतील

पान २ वर

## एलपीजी सिलेंडर १८ रूपयांनी महागले !

**मुंबई । प्रतिनिधी**



वर्षाच्या शेवटच्या महिन्यातील डिसेंबरच्या पहिल्या तारखेला महागाईचा मोठा झटका बसला आहे. तेल वितरण कंपन्यांनी एलपीजी गॅस सिलेंडरच्या किंमतीत वाढ केली आहे. विविध शहरांतील कंपन्यांनी किंमती जाहीर केल्या आहेत. यानुसार १९ किलोच्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात १८ रूपयांपर्यंत वाढ झाली आहे.

याआधी नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेलाही सिलेंडरचे दर वाढले होते. दरम्यान, १४ किलोंच्या सिलेंडरच्या दरात कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.


पान २ वर

## भाजपाच्या निर्णयाला पुर्ण पाठिंबा–एकनाथ शिंदे

### ठाण्याला निघण्यापुर्वी दरे गावात साधला माध्यमाशी संवाद

**सातारा । प्रतिनिधी**

मी मुख्यमंत्री नाही तर कॉमन मॅन आहे. जनतेने महायुतीला भरघोस मते देत आमच्यावर विश्वास दाखवला. आता आम्ही जनतेला काय देणार हे महत्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या निर्णयाला आमचा पाठिंबा असून ते जो



काही निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल असे मत काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. एकनाथ शिंदे हे साताऱ्यातील दरे गावातून ठाण्याकडे निघण्यापुर्वी माध्यमांशी बोलत होते. एकनाथ शिंदे हे साताऱ्यातील आपल्या दरे गावात होते. त्यांची प्रकृती बिघडल्याच्याही

पान २ वर

## देशाचा जीडीपी दोन वर्षात घसरुन ५.४ टक्क्यांवर

### राहूल गांधी यांची आकडेवारीसह सरकारवर टीका



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

दोन वर्षात जीडीपी घसरून ५.४ टक्क्यांवर आला. मागील दोन वर्षातली ही सगळ्यात मोठी घसरण आहे म्हणत लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधींनी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. चारचाकी गाड्या, घर घेण्याचा घटलेला दर, दैनंदिन वस्तूंच्या किमती यावरूनही राहुल गांधींनी आकडेवारीसह सरकारवर टीका केली.

पान २ वर

## उद्धव ठाकरे सोबत असते तर यापेक्षा जास्त जागा आल्या असत्या !

### भाजपा नेते रावसाहेब दानवे यांचे शिंदे, अजित पवार यांना डिवचणारे विधान

मुंबई । प्रतिनिधी

उद्धव ठाकरे सोबत असते तर आता जेवढें बहुमत मिळाले त्यापेक्षा जास्त बहुमत मिळाले असते, असे वक्तव्य माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांनी केले आहे. त्यांचे हे विधान भाजपासोबत असलेल्या एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना डिवचणारे आहे. आता शिंदे, पवारांकडून याला काय उत्तर येते याकडे लक्ष लागले आहे. एका वृत्त वाहिनीशी बोलतांना

पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.०० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड:१४५.५० क्विंटल | १,८७० | २,८७० | २,२४६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : २.०० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| बाजरी: २४.०० क्विंटल | २,५०० | २,९४२ | २,७८८ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: ३३०.५० क्विंटल | ३,९०० | ४,२५० | ४,१४७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,६०० | ६,४०१ | ५,५०० |

# सर्पदंशामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण निम्म्यावर आणणार

## केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने आणली राष्ट्रीय योजना

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**देशभरात सर्पदंशाने मृत्यूच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आता यावर उपाय शोधतांना केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने एक मोठे पाऊल उचलले असून, २०३० पर्यंत सर्पदंशाच्या प्रकरणांवर अंकुश आणण्यासाठी राष्ट्रीय योजना लागू केली आहे. या योजनेनुसार सर्पदंशामुळे होणारी मृत्यूची प्रकरणे २०३० पर्यंत निम्मी करण्याचे ध्येय निश्चित केले आहे.**



केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव यांनी सर्पदंशाबाबत सर्व राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांना पत्र पाठविले आहे. सर्पदंशाच्या घटना सार्वजनिक आरोग्याच्या संदर्भात चिंतेचे कारण बनले आहे. काही प्रकरणात मृत्यू, काही प्रकरणात अपंगत्व येण्याचाही धोका असतो. त्यामुळे केंद्र सरकारने सर्पदंशाने होणारे मृत्यूचे प्रमाण निम्म्यावर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. राज्याचा सार्वजनिक आरोग्य कायदाकिंवा इतर मान्यताप्राप्त कायद्यांच्या संबंधित तरतुदींनुसार सर्पदंशाची नोंद करुन केंद्राला लेखी कळविण्यायोग्य आजार, अशी करावी असे म्हटले आहे. म्हणजे सर्पदंशाची आकडेवारी केंद्राला दिली जाणार आहे. अर्थात, प्रत्येक संशयित, संभाव्य केस आणि झालेले मृत्यूची याची आकडेवारी कळविणे बंधनकारक केले आहे. सर्पदंशाचा सर्वाधिक धोका शेतकरी आणि आदिवासी यांना असल्याचे पत्रात नमूद केले आहे.

### भारतात ५० हजार मृत्यू

जागतिक आरोग्य संघटनेच्या आकड्यांनुसार दर वर्षी जगभरात सर्पदंशाच्या ५४ लाख घटना घडतात. एकट्या आशित दरवर्षी साप चावल्याने बांग्लादेश, भारत, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंकेमध्ये जगभरात होणा–या एकूण सर्पदंशाच्या मृत्यूपैकी ७० टक्के घटना घडतात. भारतात दरवर्षी ५० हजार लोकांचा सर्पदंशाने मृत्यू होतो.

cmyk

## अग्रलेख

# शिंदे यांची डाळ शिजणार नाहीच...!

भाजप नेतृत्वाने मुख्यमंत्री कुणाला करायचे हा निर्णय अजून घेतलेला दिसत नाही. आपले मुख्यमंत्रिपद वाचवण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दौऱ्यात शेवटचा प्रयत्न केल्याचे बोलले जाते. अर्थात त्या प्रयत्नांना यश येणार नव्हतेच. किमान मुख्यमंत्री पदाच्या मोबदल्यात काही वजनदार खाती आपल्या पक्षाला मिळावी असा प्रयत्न शिंदे यांनी केला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कदाचित त्या प्रयत्नांनाही म्हणावे तसे यश मिळाले नसल्याचे दिसते आहे. पण शिंदे यांच्या हातात काहीच नाही त्यामुळे ते रूसले काय अन् इतर काही नाटके केली काय त्याची डाळ शिजणार नाहीच हे स्वच्छ आणि स्पष्ट आहे.

तिन्ही नेत्यांच्या दिल्लीतील छायाचित्रावरून माध्यमांमध्ये बरीच चर्चा झाली. शाहांचे स्वागत करताना इतर नेते त्या छायाचित्रांमध्ये प्रसन्न मुद्रेत दिसत होते, परंतु एकनाथ शिंदेंच्या चेहऱ्यावर मात्र स्पष्ट नाराजी दिसत होती. कदाचित त्या नाराजीचा परिणाम म्हणूनच दुसऱ्या दिवशी मुंबईत महायुतीच्या पूर्वनियोजित बैठकीला पाठ दाखवीत शिंदे आपल्या गावी गेले. त्यामुळे ही बैठक पुढे ढकलावी लागली. शिंदे यांचे अस्वस्थ होणे तसे स्वाभाविक म्हणावे लागेल. गेली अडीच वर्षे ते मुख्यमंत्री होते, त्यामुळे सर्वाधिकार त्यांच्या हाती होते. अजित दादा किंवा देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असले तरी शेवटी मुख्यमंत्री म्हणून शिंदे यांचा दबदबा आणि प्रभाव अधिक होता. शिवाय मुख्यमंत्री पदाचा त्यांच्या दृष्टीने योग्य वापर करीत शिंदेंनी आपल्या आमदारांना भरपूर मदत केली. प्रसंगी अजित दादांचा विरोध डावलून त्यांनी आपल्या आमदारांसाठी सरकारी तिजोरीचे दरवाजे सताड उघडले. ही ताकद निवडणुकीत कामी आली. मात्र, आता यापुढे आपल्या माणसांना आणि आमदारांना, पक्षाला सांभाळण्यासाठी शिंदेंना भरपूर कसरत करावी लागणार आहे. सगळी सोंगे आणता येतातः परंतु पैशाचे सोंग आणता येत नाही. आतापर्यंत हाती मुख्यमंत्रिपद असल्यामुळे पैशाचा तुटवडा नव्हता परंतु यापुढे सरकारची सगळी सूत्रे मुख्यमंत्री म्हणून भाजपच्या हाती आणि तिजोरीची सूत्रे अर्थमंत्री म्हणून अजित पवारांच्या हाती असतील. त्यांच्या अस्वस्थतेमागे हे एक मोठे कारण नक्कीच आहे. मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांची कामगिरी प्रभावी ठरली, यात शंका नाही. सीएम नव्हे तर कॉमन मॅन ही त्यांची प्रतिमा लोकांना भावली. लाडक्या बहिणींचे ते नक्कीच लाडके भाऊ ठरले. लाडक्या बहिणींनी मतपेटीतूनही ते दाखवूनही दिले; परंतु आकडेवारीच्या राजकारणात त्यांना माघार घ्यावी लागली.

एकनाथ शिंदेशिवाय भाजप सरकार स्थापन करू शकणार नाही अशी परिस्थिती असती तर शिंदेंनी नक्कीच माघार घेतली नसती, परंतु आता तशी परिस्थिती नाही. त्यातच अजित पवारांनी अगदी सुरुवातीलाच फडणवीस यांना मुख्यमंत्री पदासाठी पाठिंबा दर्शवीत एकनाथ शिंदे यांची बार्गेनिंग पॉवर कमी करून टाकली. त्यामुळे एकनाथ शिंदेंनी भाजप पुढे सपशेल शरणागती पत्करीत महायुतीचे सर्वाधिकार पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांनाच असल्याचे घोषित करीत हे नेते जे काही ठरवतील ते आपल्याला मान्य असेल असे सांगितले. ती त्यांची मजबुरी होती आणि यापुढेही ती राहणार आहे. भाजपला एकनाथ शिंदे यांची गरज याआधी होती, या निवडणुकीतही होती; परंतु भविष्यात ती तशी असेलच असे नाही. अमित शाहांनी मागेच यावेळी महायुतीचे आणि पुढचे सरकार भाजपच अशी घोषणा केली आहे. त्यामुळे भविष्यात एकनाथ शिंदे म्हणा किंवा अजित पवार यांना भाजपकडून फारसे महत्त्व दिले जाईल किंवा ताकद पुरविली जाईल ही अपेक्षा करता येणार नाही. कदाचित या वास्तवाच्या जाणिवेनेच एकनाथ शिंदे सध्या अस्वस्थ असावेत. भाजपाला एकनाथ शिंदेंबद्दल ममत्व असते तर भाजपने किमान काही वजनदार खात्यासंबंधीच्या त्यांच्या मागण्या नक्कीच मान्य केल्या असत्या, परंतु तसे झालेले दिसत नाही. त्यामुळेच एकनाथ शिंदे अस्वस्थ आहेत. त्यांना आपल्या आणि आपल्या पक्षाचे भवितव्य संकटात असल्याची जाणीव आता होत असावी.

## ‘सिफा’च्या सचिवपदी शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट यांची निवड

**हैदराबाद । प्रतिनिधी**

**शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांची देशातील शेतकरी संघटनांची शिखर संघटना असलेल्या भारतीय किसान सांघ परिसंघ (सिफा)च्या राष्ट्रीय सचिवपदी निवड झाली आहे.सिफाचे मुख्य सल्लागार पी.चेंगलरेड्डी यांनी सिफाच्या हैदराबाद येथील राष्ट्रीय किसान संमेलनात ही घोषणा केली.**

कालिदास आपेट यांनी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते म्हणून शरद जोशी यांच्या नेतृत्वात सन १९८३ साली विद्यार्थी दशेपासून सुरुवात केली.सन १९८८ ते १९९० पर्यंत शरद जोशी यांच्या समवेत आंबेठाण जि.पुणे येथे वास्तव्य केले. शेतकरी संघटनेने पुकारलेल्या कर्जमुक्ती,ऊसाची झोनबंदी, कापसावरिल प्रांतबंदी आणि कर, कर्जा नहीं देंगे,बिजली का बील भी नहीं देंगे!या शेतकरी विरोधी कायद्यांच्या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.त्यांनी अनेकदा तुरुंगवास भोगला आहे. शरद जोशी यांच्या विचारांवर राष्ट्रीय पातळीवर काम करणारी सिफा ही एकमेव संघटना आहे. सिफाच्या




सचिवपदी कालिदास आपेट यांची निवड करताना डावीकडून पी.चेंगलरेडडी, नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष बिपिनभाई पटेल,मानद अध्यक्ष रघुनाथदादा पाटील,सिफाचे जनरल सेक्रेटरी शंकर नारायण रेड्डी आणि कालिदास आपेट दिसत आहेत.

## बिडीओ ज्योती राठोड यांचा हुकुमशाही कारभार

### सीईओंना दखल न घेतल्यास सामूहिक रजा आंदोलन

**जालना । प्रतिनिधी**

बदनापूर येथील गटविकास अधिकारी श्रीमती ज्योती राठोड यांच्या हुकूमशाही कारभारामुळे संतप्त झालेल्या बदनापूर तालुक्यातील ग्रामविकास अधिकाऱ्यांनी येत्या ४ डिसेंबर पासून सामूहिक रजेवर जाणार असल्याचा इशारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे. या निवेदनात म्हटले आहे की, वरिष्ठ कार्यालयाकडून कोणतेही निर्देश नसतांना घरभाडे भत्ता बंद करणे, वरिष्ठ कार्यालयाचे आदेश नसतांना ग्रामविकास अधिकाऱ्यांची हेतूपुरस्कर बदली करणे, कोणतीही पूर्व सूचना तसेच कारणे दाखवा नोटीस न देता पगार कपात करणे, ऑफिसच्या व्हाट्सअप ग्रुपवर अनावश्यक शब्दांचा वापर करून अपमानास्पद वागणुक देणे, मासिक बैठकीत अरेरावीची भाषा वापरून अपमानास्पद वागणूक देत प्रशासकीय कार्यवाही करण्याची धमकी देणे, मग्रारोहयो मध्ये अंदाजपत्रक न देता सक्तीने काम करावयास लावणे, त्यामुळे कामात अनियमीतता होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे याबाबत संघटनेने यापूर्वी दोन वेळा पत्र देऊनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे सर्व ग्रामपंचायत अधिकारी मानसिक दबावाखाली असून काही जणांच्या जीविताची हानी होण्याची शक्यता या निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. उपरोक्त मागणीची तातडीने दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. तसेच जोपर्यंत गटविकास अधिकारी श्रीमती ज्योती राठोड या बदनापुर कार्यालयात कार्यरत आहे. तोपर्यंत बदनापूर तालुक्यातील सर्व ग्रामविकास अधिकारी सामुहीक रजेवर जात असल्याचा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. जोपर्यंत वरीष्ठ अधिकारी आंदोलनाची दखल घेणार नाही तोपर्यंत सर्व ग्रा.पं. अधिकारी कार्यालयात रुजू होणार नाहीत असेही या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या निवेदनावर बदनापूर तालुका ग्रामसेवक युनियनचे अध्यक्ष लक्ष्मण आहेरकर, सचिव निता एस. खरात, आर. टी. खरजुले, कार्याध्यक्ष निलेश नक्का, आर.बी. बोकन, सी. के. चौरे, के. डी. गायकवाड, बी. डी. गायकवाड, बी. जी. पंजाबी, ए.जी. राऊत, व्ही. के. चापाईतकर, ए.के. हिरेकर, बी. डी. पाटील, पी.जी. काळे, आर.बी.पवार यांच्यासह तालुक्यातील अन्य ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बीड शहराच्या बकालपणाला कारणीभूत कोण?

## माझं बीड सुंदर, स्वच्छ बीड हे फक्त बोलण्या पुरतं कागदोपत्रींच

बीड आणि स्वच्छता खरंतर हा विषयच वेगळा आहे. अनेक जन आले या नगरपालिकेवर अविरत पणे सत्ता भोगली. प्रत्येकजण त्यांच्या कालावधीत बीड सुधारून म्हणजे बिडचा चेहरा बदलून गेला. असे प्रत्येकाचे म्हणणे.

मग हे जे सर्वसामान्य माणसाला पावलगणिक लागणारे खडे, विनाकारण चे हजारो स्पीड ब्रेकर.रस्त्यात येणारे नालीचे पाणी. मोठा रस्ता असला तरी छोट्या नाल्या, नालीचे अरुंदी करण, प्रत्येक गल्लीतील अतिक्रमण, शहरातील रस्त्यातील अतिक्रमण अशा असंख्य गोष्टी आहेत.त्या तश्याच आहेत मग नेमकी आता पर्यंत च्या सुंदर अश्या बिडच्या विकासाचे क्रेडिट द्यायचे कोणाला? पाणी हा विषय बीड मधील सरता सरत नाही. हजारो पाणी साठवण्याचे प्रकार विकसित झाले. मग बीड मधील पाणी जिथल्या तिथे राजकीय मुद्या ला येऊन जिरते कसे तेच कळतं नाही.

आता पर्यंत झालेला विकास जनतेला कसा दिसला नाही. जग कुठल्या कुठे चालले आणि आपण अजून वीज ,रस्ता ,पाणी यावरच राजकीय पोळी वर्षानुवर्षे भाजत आहोत. निवडणुका आल्या कि आश्वासने द्यायची अन निवडून आले कि त्या आश्वासनावर लाथ मारायची. परत ५ वर्षांनी तेच मुद्दे असे पूर्ण दोन पिढ्या सरलेली माणसे आणि राजकारण पाहिलेली आमची पिढी सुन्न झाली आहे. जानीवा च संपल्या सर्व. अर्थात याला जबाबदार सर्वसामान्य माणसे हि आहेत. या माणसांची सहन शिलता वाखाणण्या जोगी आहे. जोक नाही हा एवढं सहन करणे आणि बधिर असल्या सारखे परत परत त्याच राजकारण्यांना निवडून देणें किती सहन शक्ती चिवट पहा सामान्य माणसांची. वर्षानुवर्षे दर दहा दिवसांनी पाणी भरायचे. लाईट बिले प्रत्येकाला भरसाठ भरली तरी सणासुदीला अंधारच सहन करणे, रस्त्यात खड्डा चुकवायला निघाले कि गाडी स्पीड ब्रेकरवर आदळलीच समजायचे. भाजी मंडईत जनावरे माणसाला ढुसन्या देतात कि माणसे जनावरा ला हेच कळतं नाही. रविवारचा बाजार तर पुलावरून सरकून अजून किती माळवेस कडे येतोय कुणास ठाऊक. काही दिवसात रविवारचा बाजार आणि भाजी मंडइ एकत्र नांदल्या शिवाय राहणार नाही. दोन्ही सरकत सरकत प्रत्येकाच्या दारासमोर येईल कि काय असेच वाटत आहे .आणि आश्या वेळेस हे राजकारणी म्हणतील सुद्धा कि पहा आम्ही इतका विकास केला कि प्रत्येकाच्या दारात बाजार आणला. म्हणजे अश्या गोष्टी ला सुद्धा विकासाचे नाव देतील असेच वाटते. अश्या ठिकाणी किमान आठवड्यातून एकदा रविवारी ट्रॅफिक पोलीस नको का तिथे. का तो बिचारा साठे चौकात फाडतोय पावती अन सगळी माणसे बाजारात. काय कुणास दोष द्यावा असच झालं सगळ. बिडला आराखडा नावाची गोष्ट आहे कि नाही. का बीड शहराला देशाच्या आराखड्यात कोठेही घुसायचे.मेन रस्त्यावर अतिक्रमण शिरकाव करतच आहे. प्रत्येक मेन गावाच्या बाहेर जाणाऱ्या रस्त्याला काही न काही दुकाने लागलेली.

सणावाराला सुभाष रोडवरील गाडयांची गर्दी झाली कि गाडी उचलून घेऊन जायची का ट्रॅफिक ला कायम स्वरूपी एखादी जागा देणें यात सोपे कोणते राहील.कोणतेही कारण असले तरीही बीड ची एक प्रथा पडली वाढदिवसाचे आणि दुसऱ्या कशाचे निमित्त मिळाले कि उठसूट लाव बॅनर पाच पन्नास. बीड मध्ये नवीन तयार होणारे दादा,काका, मामा भैया चे बॅनर तर मजेशीर लावलेले असतात. इतक्या जवळ जवळ लावतात एक सारखे पहिले तर वाटते आता त्या बॅनर च्या बाहेर येऊन आपल्या सोबत केक कापातील कि काय.

मोठे बॅनर तर ढीग भरच असतील. या सर्व बॅनर ला परमिशन तरी कशी मिळते. अन परमिशन न घेता बॅनर लावले तर काही नियम वगैरे आहेत कि नाही. का कोणी येऊन उठसूट बॅनर लावायचे. या बॅनर ने किती अडथळा येतो हे पालिकेला दिसतो कि नाही.

सर्वात महत्वाचे म्हणजे बीड चे सर्व रस्ते फक्त कोणी मोठे राजकीय

पदधिकारी आले तरच झाडले जातात. वर्षानुवर्षे या रोड ला झाडू लागत नाही.रस्त्यावरील कचरा दिवस दिवस काय अन वर्षानुवर्षे काय तसाच असतो .जोराचे वारे आले तरच तो कचरा जागचा हलला जातो. ही कामे करण्यासाठी नियुक्त केलेली माणसे मग रोज काय करतात. का हि माणसे नियुक्त केलेली नसून कोणी मोठे आले तरच रोजनदारी वर लावतात. मग काय कागदोपत्री माणसे लावलेली आहे. आन त्यांचे उचलेले पगार जिथल्या तिथेच जिरतात का.

बीड आणि विकास हे शब्द एकमेकांन सोबत लागतील का नाही.

साठे चौकात नेमकी वळवतानाच फळांचे गाडे आहेत. नेमकी तिथेच असेल तर अपघात कसे कंट्रोल करणार. त्याच्या विरुद्ध दिशेला म्हणजे सुभाष रोड कडे वळतो तिथे बॅनर लावले वरती एका ठराविक उंचीला पण नाही असे खाली आहेत.रस्त्याच्या मध्ये डीवायडर मध्ये झाडे लावली जातात अन त्याची निगा हि राखली जातं नाही. कधीच पाणी देत नाहीत.

अश्या पद्धतीचे काम आणि जनता तर झोपलेलीच तीला कधीच जाग येत नाही.

बीड आणि स्वच्छता

खरंतर हा विषयच वेगळा आहे. अनेक जन आले या नगरपालिकेवर अविरत पणे सत्ता केली.

प्रत्येकजण त्यांच्या कालावधीत बीड सुधारून म्हणजे बिडचा चेहरा बदलून गेला. असे प्रत्येकाचे म्हणणे.

मग हे जे सर्वसामान्य माणसाला पावलगणिक लागणारे खडे, विनाकारण चे हजारो स्पीड ब्रेकर.रस्तात येणारे नालीचे पाणी. मोठा रस्ता असला तरी छोट्या नाल्या, नालीचे अरुंदी करण, प्रत्येक गल्लीतील अतिक्रमन, मेन गावात रस्त्यातील अतिक्रमण असे असंख्य गोष्टी आहेत तश्याच आहेत मग नेमकी आता पर्यंत च्या सुंदर अश्या बिडच्या विकासाचे क्रेडिट द्यायचे कोणाला.

पाणी हा विषय बीड मधील सरता सरत नाही. हजारो पाणी साठवण्याचे प्रकार विकसित झाले. मग बीड मधील पाणी जिथल्या तिथे राजकीय मुद्या ला येऊन जिरते कसे तेच कळतं नाही.

आता पर्यंत झालेला विकास जनतेला कसा दिसला नाही. जग कुठल्या कुठे चालले आणि आपण अजून वीज रस्ता पाणी यावरच राजकीय पोळी वर्षानुवर्षे भाजत आलेली आहे. इलेक्शन आले कि आश्वासन द्याची अन निवडून आले कि त्या आश्वासनावर लाथ मारायची. परत ५ वर्षांनी तेच मुद्दे असे पूर्ण दोन पिढ्या सरलेली माणसे आणि राजकारण पाहिलेली आमची पिढी सुन्न झाली आहे जानीवा च संपल्या सर्व. अर्थात याला जबाबदार सर्वसामान्य माणसे हि आहेत. या माणसांची सहन शिलता वाखाण्या जोगी आहे. जोक नाही हा एवढं सहन करणे आणि बधिर असल्या सारखे परत परत त्याच्या राजकारणाला निवडून देणें किती सहन शक्ती चिकट पहा सामान्य माणसांची. वर्षानुवर्षे दर दहा दिवसांनी पाणी भरायचे. लाईट बिले प्रत्येकला भरसाठ भरली तरी सणासुदीला अंधारच सहन करणे, रस्त्यात खड्डा चुकवायला निघाले कि गाडी स्पीड ब्रेकरवर आदलीच समजायच. भाजी मंडईत जनावरे माणसाला डूसन्या देतात कि माणसे जनावर ला हेच कळतं नाही. रविवारचा बाजार तर पुलावरून सरकून अजून किती माळवेस कडे येतोय कुणास ठाऊक. काही दिवसात रविवारचा बाजार आणि भाजी मंडइ एकत्र नांदल्या शिवाय राहणार नाही. दोन्ही सरकत सरकत प्रत्येकाच्या दरासमोर येईल कि काय असेच वाटत आहे आणि अश्या वेळेस हे राजकारणी म्हणतील सुद्धा कि पहा आम्ही इतका विकास केला कि प्रत्येकच्या दारात बाजार आणला. म्हणजे अश्या गोष्टी ला सुद्धा विकासाचे नाव देतील असेच वाटते. अश्या ठिकाणी किमान आठवड्यातून एकदा रविवारी ट्रॅफिक पोलीस नको का तिथे का तो बिचारा साठे चौकात फाडतोय पावती अन सगळी माणसे बाजारात. काय कुणास दोष द्यावा असच झालं सगळ. बिडला आरकखडा नावाची गोष्ट आहे कि नाही का बीड शहराला देशाच्या आराखड्यात कोठेही घुसायचे.मेन रस्त्यावर अतिक्रमण शिरकाव करतच आहे. प्रत्येक मेन गावाच्या बाहेर जाणाऱ्या रस्त्याला काही न काही दुकाने लागलेली.

सनावराला सुभाष रोडवरील गाडयांची गर्दी झाली कि गाडी उचलून घेऊन जायची का ट्रॅफिक ला कायम स्वरूपी एखादी जागा देणें यात सोपे कोणते राहील.कोणतेही कारण असले तरीही बीड ची एक प्रथा पडली वाढदिवसाचे आणि दुसऱ्या कशाचे निमित्त मिळाले कि उठसूट लाव बॅनर पाच पन्नास. बीड मध्ये नवीन तयार होणारे दादा,काका, मामा भैया चे बॅनर तर मजेशीर लावलेले असतात. इतक्या जवळ जवळ लावतात एक सारखे पहिले तर वाटते आता त्या बॅनर च्या बाहेर येऊन आपल्या सोबत केक कापातील कि काय.

मोठे बॅनर तर ढीग भर च असतील. या सर्व बॅनर ला परमिशन तरी कशी मिळते अन परमिशन न घेता बॅनर लावले तर काही नियम वैगरे आहेत कि नाही. का कोणी येऊन उठसूट बॅनर लावायचे. या बॅनर ने किती अडथळा येतो हे पालिकेला दिसतो कि नाही.

सर्वात महत्वाचे म्हणजे बीड चे सर्व रस्ते फक्त कोणी मोठे राजकीय पदधारी आले तरच झाडले जातात. वर्षानुवर्षे या रोड ला झाडू लागत नाही.रस्त्यावरील कचरा दिवस दिवस काय अन वर्षानुवर्षे काय तसाच असतो जोराचे वारे आले तरच तो कचरा जागचा हलला जातो. हे कामे करण्यासाठी नियुक्त केलेली माणसे मग रोज काय करतात. का हि माणसे नियुक्त केलेली नसून कोणी मोठे आले तरच रोजनदारी लावतात. मग काय लिखानापूरती कागदोपत्री माणसे लावलेली आहे. आन त्याची उचलेले पगार जिथल्या तिथेच जिरतात का.

अश्या पद्धतीचे राज्य आणि प्रजा तर झोपलेली असते. तीला जाग येत नाही. ती फक्त घरात बोलते

आपलं बहिर राज्य त्या राज्य ला काने नाहीत अन प्रजा मुकी काही बोलत नाही. वर्षानुवर्षे असेच चालू आहे.

मुक्या आणि बहिऱ्यानो असेच रहा. तुमच्या पुढच्या पिढीला हि हेच शिकवा. तुम्हला तुमचा स्वतः चा आवाज हि ऐकू येत नसेल तर तुमच्या सारखे शुभं तुम्हीच. तुम्ही कशालाच आवाज करत नाही म्हणल्यावर होऊ देत काय व्हायचं ते बिना पाण्याचे मरा तिकडेच, लाईट बिल भरून अंधारात जगा. रस्ते आणि खढ्यात जाऊन जाऊन कंबरडे मोडून घ्या.तुम्ही दादा, मामा, काका, भैया याचे वाढदिवस भर रस्त्यात ट्रॅफिक अडवून साजरे करा पण तोच रस्ता चांगला करण्या साठी हे तुमचे काका मामा भैया येत नाहीत. तुम्ही फक्त लाचारी करा आयुष्यभर. असेच परत इंग्रज सारखे कोणी येतील अन तुम्हला कायमचे लाचार बनवतील. काय करायचं ते ठरवा.



**रुपाली देशपांडे बीड**
**मो.८८८८९५५५३९**

## पान १ वरून...

### सत्ता स्थापनेचा दावा न करताच

सांगण्यात येत आहे. तसेच त्यांच्या हाताला पट्टी वैगरे बांधून बसले आहेत असे समजते. त्यामुळे त्यांची प्रकृती खुप नाजूक असल्याचे बोलले जात असून त्यांच्या तेथील डॉक्टरही तपासणीसाठी गेले होते. मात्र एकनाथ शिंदे यांना कोणत्या डॉक्टरांची गरज आहे की कोण्या मांत्रिकाची गरज आहे हे आम्हाला माहित असल्याची खोचक टीकाही यावेळी एकनाथ शिंदे यांच्यावर केली. दरम्यान, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी संध्याकाळी एक्स वर पोस्ट करत राज्यातील महायुतीचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी होणार असल्याची घोषणा करत दोन दिवसात दिल्लीतील केंद्रीय निरिक्षण येऊन मुख्यमंत्री पदाबाबत निर्णय जाहिर करणार असल्याचे सांगितले आहे.

------

### स्वबळावर लढवणार

लोकशाहीत प्रत्येकाला तसे करण्याचा अधिकार आहे. लोकशाहीत कोणीही काहीही काढू शकतो. दरम्यान, फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्लीत विधानसभेच्या एकूण ७० जागांवर निवडणुका होणार आहेत.

------

### भाजपाच्या निर्णयाला

बातम्या आल्या होत्या. दरम्यान रविवारी त्यांनी ग्रामदेवतेचे दर्शन घेतले. त्यानंतर ते हेलिकॉप्टरने ठाण्याला निघाले. या दरम्यान त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. आमच्या सरकारने कधीही न राबवलेल्या कल्याणकारी योजना राबवल्या. लाडकी बहीण, भाऊ, शेतकरी यांच्यासाठी काम केले. एकुणच अडीच वर्षात महायुतीन चांगले काम केल्याचे म्हणत विरोधकांना काही काम नसल्याने ते इव्हीएमवर बोलतात अशी टीका त्यांनी केली.

---------

### एलपीजी सिलेंडर १८

एलपीजी सिलेंडच्या दरात १ डिसेंबरपासून बदल करण्यात आलेले आहेत. दिल्लीपासून ते मुंबईपर्यंत या दरात बदल झाले आहेत. १ डिसेंबरला देशाची राजधानी दिल्लीमध्ये १९ किलोच्या एलपीजी सिलेंडरटे दर १८१८.५० रूपये झाले आहेत. आधी हे दर १८०२ रूपये होते. बऱ्याच कालावधीपासून १९ किलोच्या कमर्शियल गॅस सिलेंडरच्या दरात सातत्याने वाढ पाहायला मिळत आहे. मात्र १४ किलोंच्या घरगुती सिलेंडरच्या दरात कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.

------------

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

गटनेते, मुख्य प्रतोद आदी पदांच्या जबाबदारीसाठी ज्येष्ठांबरोबर नवख्या आमदारांची निवड करण्यात आली. यावेळी बोलताना जंयत पाटील म्हणाले की, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीत पाच वाजल्यानंतर ८ टक्केपेक्षा जास्त मतदान वाढले. हे अचानक वाढलेले मतदान प्रश्न निर्माण करते. त्यामुळे निवडणूका पारदर्शी आणि विश्वासार्ह व्हाव्यात यासाठी निवडणूका बॅलेट पेपरवर व्हाव्यात अशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची मागणी असल्याचेही यावेळी सांगितले.

---------------

### उद्धव ठाकरे सोबत असते तर यापेक्षा

रावसाहेब दानवे म्हणाले, पाच तारखेला भारतीय जनता पार्टीच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी आहे. आधी विधिमंडळ पक्षाची बैठक होईल, नेता निवडला जाईल आणि त्यानंतर मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला जाईल. जसे ठरले तसे सुरू आहे. कोणताही वादविवाद आमच्यात नाही. मुख्यमंत्री कोण हा प्रश्न सगळ्यांनाच पडला आहे. मात्र आमचे मुख्यमंत्री कोण हे ठरले आहे. जोवर वरिष्ठांची सही होत नाही तोवर अधिकृतरित्या प्रकाशित होत नाही, असा आमचा पार्टीचा विषय आहे, असे ते म्हणाले. पुढे बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले, संजय राऊत म्हणतात त्यांचा चेहरा पडला पण हे सारेच पडले तरी आम्ही त्यांच्याबद्दल बोलत नाही. ते जे बोलले ते खोटें ठरले. त्यांच्या वागण्यामुळे शिवसेना फुटली आता ते उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंमध्ये भांडण लावत आहेत. भाजप - शिवसेना एकत्र राहिली असती तर यापेक्षा जास्त बहुमत मिळाले असते, असे ते म्हणाले.

--------

### देशाचा जीडीपी दोन वर्षात

राहुल गांधींनी सोशल मीडियावर पोस्ट करत केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली. राहुल गांधी म्हणाले की, देशातील शेतकरी, मजूर, मध्यमवर्ग आणि गरीब विविध आर्थिक समस्यांशी झुंजत आहेत. किरकोळ महागाई दराने १४ महिन्यात सर्वाधिक ६.२१ टक्क्यांचा उच्चांक गाठला आहे. तसेच भारताचा जीडीपी दर दोन वर्षांतील सर्वात कमी ५.४ क्क्यांवर आला आहे. केवळ काही मोजक्या लोकांनाच फायदा होत असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था प्रगती करू शकत नाही हे स्पष्ट आहे. गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरच्या तुलनेत यंदा बटाटे आणि कांद्याच्या दरात सुमारे ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. याशिवाय रुपयाने ८४.५० ही नीचांकी पातळी गाठली आहे. राहुल गांधी म्हणाले की, देशातील बेरोजगारीने ४५ वर्षांचा विक्रम मोडीत काढला आहे. गेल्या ५ वर्षात कामगार, कर्मचारी आणि छोटे व्यापारी यांचे उत्पन्न थांबले आहे किंवा लक्षणीय घटले आहे. १० लाख रुपयांपेक्षा कमी किंमत असलेल्या गाड्यांची विक्री २०१८-१९ च्या तुलनेत ८० टक्क्यांहून ५० टक्के एवढी कमी झाली आहे. घरांची विक्री ३८ टक्क्यावरून २२ टक्क्यांवर आली आहे. याशिवाय, दैनंदिन जीवनातील वस्तूंच्या उत्पादनांची मागणी आधीच कमी होत आहे. कॉर्पोरेट कराचा वाटा गेल्या १० वर्षांत ७ टक्क्यांनी घटला आहे, तर आयकराचा वाटा ११ टक्क्यांनी वाढला आहे. म्हणूनच भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी नवीन विचारांची गरज आहे आणि व्यवसायांसाठी नवीन करार हा त्याचा महत्त्वाचा भाग आहे. तेव्हाच सर्वांना पुढे जाण्याची समान संधी मिळेल आणि आपल्या अर्थव्यवस्थेचे चाक पुढे सरकेल, असेही राहुल गांधी म्हणाले.

cmyk




बीड : शहरातील भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली. पक्षाचे मतदार नोंदणी अभियान बीड शहरात दोन दिवसानंतर सुरु होणार आहे. याची सर्व पदाधिकारी यांनी नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ०२ डिसेंबर २०२४



# पोलिस प्रशासन महसूल विभागाच्या मदतीने राबवणार शेतकरी प्रेरणा अभियान

**सोलापूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील बहुतेक गुन्हे प्रॉपर्टी तथा शेतीच्या वादातूनच होतात, अशी वस्तुस्थिती आहे. शेतीचे वाद आता गावातच मिटावेत म्हणून पोलिस प्रशासन महसूल विभागाच्या मदतीने शेतकरी प्रेरणा अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

पोलिस बंदोबस्तात महसूलचे अधिकारी त्या शेतावर जावून दोन शेतकऱ्यांमधील वाद मिटवतील, अशी माहिती पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. शेतकरी प्रेरणा अभियान राबविण्यापूर्वी प्रत्येक तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी, प्रश्न जाणून घेतले जातील. त्याचा सर्व्हे होवून अहवाल पोलिस व महसूल प्रशासनाला जाईल. त्यानंतर तहसीलदार त्या त्या तालुक्याचे नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करून त्यांच्या नेतृत्वात तालुकानिहाय विशेष मोहीम राबविली जाणार आहे.

शेजारील शेतकऱ्याच्या वादामुळे मोजणी थांबली आहे आणि त्यामुळे वाद होत आहेत, बांधाचा वाद आहे किंवा रस्त्याचा वाद आहे, अशा समस्यांवर



त्याठिकाणी पोलिस बंदोबस्तात तोडगा काढला जाणार आहे. त्यानंतर शेतीच्या वादातून भांडणे, वाद कमी होतील, असा विश्वास पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी यावेळी व्यक्त केला. याशिवाय ते म्हणाले, प्रत्येक पोलिस ठाण्यात पिंक रुम तयार केली जाणार असून त्याठिकाणी अन्यायग्रस्त महिला, अल्पवयीन मुलींचे जबाब घेतले जातील किंवा त्यांच्या तक्रारी घेणे, मेडिकल करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे होईल, असेही पोलिस अधीक्षकांनी यावेळी सांगितले.

विधानसभा निवडणुकीतील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी ड्रोनचा वापर केला होता. आता चोरी, अवैध वाळू उपसा, वाहतूक कोंडी अशा बाबींवर ड्रोनद्वारे लक्ष ठेवले जाणार आहे. त्यासाठी नाईट व्हिजन ड्रोनसह अन्य प्रकारचे ड्रोन दिवस-रात्र विविध भागावर लक्ष ठेवणे शक्य होणार आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी मागितला जाणार आहे.

याशिवाय गुन्हेगारी रोखण्यासाठी सीसीटीव्हीचाही वापर होणार असून सायबर, स्थानिक गुन्हे शाखा व सोशल मिडिया टीम, सराईत गुन्हेगारांवर लक्ष ठेवणार आहे. विशेष बाब म्हणजे सोशल मिडियावर कोणी आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यास त्यासंबंधीचा अलर्ट पोलिसांना येतो, अशी यंत्रणा देखील ग्रामीण पोलिसांनी उभारली आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत सर्वच अधिकारी, अंमलदारांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल पोलिस अधीक्षकांनी त्यांचे कौतुकही केले.दोन किंवा त्याहून अधिक गुन्हे दाखल सराईत गुन्हेगारांवर कोम्बिंग ऑपरेशन व ऑपरेशन ऑल आऊटद्वारे लक्ष ठेवले जात असून त्यांची पोलिस ठाणेनिहाय यादीच तयार केली आहे. प्रतिबंधात्मक कारवायांमुळे जिल्ह्यातील क्राईम रेट कमी झाला आहे. आता शेतीचा रस्ता, बांधावरुन होणारी भांडणे मिटावीत म्हणून महसूल प्रशासनाच्या मदतीने शेतकरी प्रेरणा अभियान राबविले जाईल. अपघात रोखण्यासाठीही ठोस उपाययोजना केल्या जाणार आहेत.असे सोलापूर ग्रामीण पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगीतले.

# भारतीय वंशाचे काश पटेल एफबीआयचे नवे संचालक; डोनाल्ड ट्रम्प यांचा मोठा निर्णय

वॉशिंग्टन । वृत्तसेवा

अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वंशाचे काश पटेल यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. ट्रम्प यांनी काश पटेल यांची एफबीआयच्या संचालकपदी नियुक्ती केली आहे. गुजराती असलेले काश पटेल हे ट्रम्प यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात.

डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी (३० नोव्हेंबर) रात्री त्यांच्या सोशल मिडिया हॅण्डलवरून हा निर्णय जाहीर केला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, मला हे जाहीर करताना अभिमान वाटत आहे की, कश्यप काश पटेल केंद्रीय तपास यंत्रणेचे नवीन संचालक म्हणून काम करतील. काश एक चांगले वकील आहेत. तपास करणारे आणि अमेरिका फर्स्ट फायटर आहेत ज्यांनी त्यांची कारकीर्द भ्रष्टाचार समोर आणण्यासाठी, न्यायाची रक्षा करण्यासाठी आणि अमेरिकेच्या लोकांचे रक्षण करण्यात घालवली आहे.पटेल यांनी रशियाच्या डाव उघड करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि सत्य, उत्तरदायित्व आणि संविधानाचे समर्थक म्हणून उभे राहिले आहेत असेही डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.



## कोण आहेत काश पटेल?

४४ वर्षीय काश पटेल यांचे पूर्ण नाव कश्यप प्रमोद पटेल असे आहे. त्यांचा जन्म न्यूयॉर्कमध्ये झाला होता. त्यांचे कुटुंब मूळचे गुजरातमधील वडोदरा येथील आहे. त्यांचे कुटुंब पेशाने वकील आहे. काश पटेल यांना डोनाल्ड ट्रम्प यांच्या निकटवर्तीय व्यक्तींपैकी एक समजले जाते.

## संचालकपदाचा कार्यकाळ १० वर्षांचा

डोनाल्ड ट्रम्प यांच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात काश पटेल हे राष्ट्राध्यक्षांचे उप सहायक आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या दहशतवाद विरोधी समितीचे वरिष्ठ संचालक म्हणून कार्यरत होते. काश पटेल हे ख्रिस्तोफर रे यांची जागा घेतील. ख्रिस्तोफर रे यांना २०१७ मध्ये नियुक्त करण्यात आले होते. पण, नंतर त्यांची राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या सहका-यांशी पटले नाही. एफबीआयच्या संचालकपदाचा कार्यकाळ १० वर्षांचा असतो. गेल्या अनेक दिवसांपासून डोनाल्ड ट्रम्प त्यांच्यावर आणि एफबीआयवर जाहीरपणे टीका करत आहेत.

# चीनमध्ये सापडली १००० मेट्रीक टनची सोन्याची खाण

**शांघाय । वृत्तसेवा**

जगातील दुस-या सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थेला जगातील सर्वांत मोठा सोन्याचा साठा सापडला आहे. यामुळे अमेरिकेच्या टेंशनमध्ये वाढ झाली असून सुस्त पडलेल्या चीनच्या अर्थव्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे. यामुळे मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या भारताच्या स्वप्नांनादेखील सुरुंग लागणार आहे.



कोरोना काळापासून चीन एका मोठ्या बंपर लॉटरीच्या शोधात होता. जगाची फॅक्टरी अशी ओळख असलेल्या चीनला अमेरिका ट्रेड वॉर सुरु करून अडवत होता. भारतानेही चिनी कंपन्यांवर अनेक बंधने घातली होती. यामुळे चीनच्या नाड्या आवळल्या जात होत्या. अशातच चीनच्या हाती मोठा खजिना लागला आहे. चीनच्या हुनान प्रांतात हे सोने सापडले आहे. १००० मेट्रीक टन एवढा मोठा साठा असल्याचा अंदाज आहे.

याचे बाजारातील मुल्य हे ८३ अब्ज डॉलर एवढे आहे. चीन आधीच सोन्याच्या बाजारात मोठा उत्पादक आहे, आता तर त्याला मोठा बुस्टच मिळाला आहे. २०२३ मध्ये जगाच्या जवळपास १० टक्के सोने हे चीनचे होते. आपल्या आरबीआयकडेच ८५० मेट्रीक टन सोने आहे, याच्या तुलनेत चीनच्या हाती किती मोठे भांडार लागले आहे, याची गणती केली जाऊ शकते.

आजही ज्या देशाकडे जेवढे जास्त सोने त्याला तेवढा जास्त ताकदवर मानले जाते. अमेरिकेकडे ८१३३ मेट्रीक टन एवढे सोने रिझर्व्ह आहे, तर ३३१५ मेट्रीक टन सोन्याच्या साठवणुकीने जर्मनी दुस-या क्रमांकावर आहे. या यादीत चीन सहाव्या आणि भारत देश नवव्या स्थानावर आहे.

सोने महत्वाचे साधन

जेव्हा चलन आंतरराष्ट्री स्तरावर घसरते तेव्हा सोनेच खरेदी-विक्रीचे महत्वाचे साधन बनते. सोन्याचा वापर करून आर्थिक संकटात असलेले देश हे व्यवहार करतात आणि संकटातून बाहेर येतात. १९९१ मध्ये भारतानेही सोन्याच्या मदतीने आर्थिक संकटावर मात केली होती.

# महाराष्ट्राची पहिली लाडकी मुख्यमंत्री म्हणून पंकजाताई यांना जनतेची पसंती-अश्विनी घुले

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आपल्या सर्वांना हात जोडून विनंती करण्यात येते की हा मेसेज आपल्या भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब व गृहमंत्री अमित जी शहा साहेब यांच्यापर्यंत पोहोचला पाहिजेत आणि त्यांनी ताईच्या कामाची विचारपूस करून ताईंना मुख्यमंत्री केलंच पाहिजे. ताईंनी विधानसभेसाठी स्टार प्रचारक म्हणून विडा उचलला आणि तो पूर्ण केला. जास्तीत जास्त सभा घेऊन आमदार निवडून आणले ताईंनी जीवाचे रान केले. हात फॅक्चर असताना देखील त्यांनी दिवस-रात्र करून जेवण देखील हेलिकॉप्टर मध्येच केले. विरोधकांच्या शिव्या खाल्ल्या, पण भारतीय जनता पार्टीने दिलेली जबाबदारी ताईने पूर्णपणे पार पाडून, अपक्ष आमदार धरून २३७



आमदार सरकारला दिले आणि त्यावर वरील महोदय म्हणतात की मला मुख्यमंत्री करा! खरं बघितलं तर माननीय मुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी मुंबई सोडली नाही. माननीय फडणवीस साहेब यांनी नागपूर सोडले नाही. माननीय अजितदादांनी बारामती सोडली नाही. कारण यांना सर्वांना पडण्याची भीती होती. त्यामुळे यांनी कुठेच सभा घेतल्या नाही. या विधानसभेत सहभाग घेतला तो फक्त आणि फक्त माननीय पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांनीच पैकी पैकी आमदार निवडून आणले, आणि परत तेच सांगतात की आम्ही लाडक्या बहिणीचा आम्हाला फायदा झाला लाडक्या बहिणींनी आम्हाला पूर्णपणे पाठिंबा दिला मग मला या ठिकाणी आवर्जून सांगायची की लाडकी बहीण माननीय पंकजाताई मुंडे या नाहीत का? ताई तर तुमची बहीणच आहे ना! मग तुम्ही सर्वजण मिळून ताईंना मुख्यमंत्री होण्यासाठी विरोध का करता ! तुम्ही असे का बोलत नाही की ताईंना मुख्यमंत्री करा आम्ही सर्वजण समर्थन देतो. होऊन जाऊ द्या, आपल्या महाराष्ट्राची पहिली महिला लाडकी बहीण मुख्यमंत्री माननीय पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना जनतेची पसंती..! अशी मागणी अश्विनी सुदर्शन घुले यांनी जनहितार्थ प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

पान ६ वरून...

## विधानसभा संपली आता

याशिवाय खासदार बजरंग बप्पा सोनवणे हेही आपल्या सोबत आहेत. आता निधी कसा मिळत नाही तेच पाहू असे संदीप क्षीरसागर यावेळी म्हणाले .

यावेळी बोलताना खासदार बजरंग सोनवणे म्हणाले की संदीप क्षीरसागर यांनी माझ्यासाठी जिवाचे रान केले. जेवढी मतै मला मिळाली तेवढीच मते संदीप क्षीरसागरांना मिळाली. यापुढे आता निधी आणण्यासाठी आम्ही एकत्र काम करू .यापुढे कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, आमदार प्राध्यापक सुनील धांडे ,माजी आमदार उषाताई दराडे, रवींद्र दळवी आदींनी आपले मत व्यक्त केले. या सत्कार सोहळ्याला विधान बीड विधानसभेच्या क्षेत्रातील कार्यकर्ते हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चुंबळी गावात पिण्याच्या

नसल्याने चुंबळी ग्रामस्थ चिंतित असून या विरोधात रस्त्यावर उतरण्याचे मनस्थितीत असल्याचे दिसुन येत आहे..

अनेकदा पाठपुरावा करूनही अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष:-कॉ.महादेव नागरगोजे

मी या विरोधात पाठपुरावा केला असुन आंदोलनही केले असून संबधीत अधिकाऱ्यांनी फक्त लेखी आश्वासन देत वेळ मारत असल्याने चुंबळी गावात झालेल्या भ्रष्टाचारात संबंधित अधिकाऱ्यांचेही हात काळे झाल्यानेच अधिकारी कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचे येत आहे.तात्काळ विविध योजनेत भ्रष्टाचार करणाऱ्यावर कारवाई करावी नसता या विरोधात जन आंदोलन उभारण्यात येणार आहे असे कॉ.महादेव नागरगोजे यांनी सांगितले आहे.

## चोभानिमगाव येथील महिलेचा

१.३० वा. वैशालीवर चोभा निमगाव येथील मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावासह परिसरातील लोकांनी गर्दी केली होती. परिसरात हळहळ व्यक्त केली जात होती. याबाबत अकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे करत आहेत.

## पेंडगावच्या हनुमान मंदीरात

मारुती मंदिरामध्ये एकच मूर्ती असते, मात्र या मंदिरामध्ये दोन मूर्ती आहेत. या ठिकाणी हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो, तसेच प्रत्येक शनिवारी पंचक्रोशीतील भाविक भक्तांकडून या ठिकाणी भंडारा महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. तर याठिकाणी भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी येथे पहावयास मिळते.

## आ.प्रकाश सोळंके यांचा

जनतेने आ. सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघात निवडुण देऊन जनतेच्या मनातील विकसनशील आमदार प्रकाश सोळुंके यांना मंत्रिमंडळात समावेश करावा. असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट रोजगार स्वयंरोजगार सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय दादा पोकळे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ग्रंथालय विभाग बीड जिल्हाध्यक्ष बालासाहेब फपाळ पाटील यांनी एका निवेदनाद्वारे अजित पवार यांच्याकडे मागणी केली आहे.

## श्रीराम गोजमगुंडे स्मृती

तथा सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक वामन केंद्रे, सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, सुधीर निकम, संदीप पाठक, अरविंद जगताप यांच्यासारखे दिग्गज कलाकार महाराष्ट्राला दिले. ते अशाच नाट्य करंडक स्पर्धांमधून पुढे गेलेले होते. त्यामुळे अशा स्पर्धा खूप महत्वपूर्ण ठरतात. कारण प्रत्येकालाच मुंबई किंवा पुणे याठिकाणी जाऊन नाट्याभिनयाचे धडे घेणे शक्य नसते. त्यामुळे अशाप्रकारच्या स्पर्धा आणि उपक्रम अभिनयाची आवड असणाऱ्या कलावंतांसाठी नवी पाउलवाट तयार करण्याचे काम करत असतात. गोजमगुंडे करंडकचे हे जरी पहिले वर्ष असले तरी येणाऱ्या काळात या नाट्य करंडकचा वटवृक्ष होईल असा मला विश्वास वाटतो. ज्या श्रीराम गोजमगुंडे यांच्या नावाने हे करंडक सुरू केले आहे, ते मराठवाड्यातील पहिले चित्रपट कलावंत, दिग्दर्शक आणि निर्माता होते. त्यांनी अनेक नाटकात आणि चित्रपटात भुमिका साकारलेल्या आहेत. या स्पर्धा अल्पावधीतच नावारूपाला येतील आणि आपला लौकिक सबंध महाराष्ट्रात करतील याची मला खात्री आहे, असे त्या म्हणाल्या. या स्पर्धांना महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून अनेक संघानी सहभाग नोंदविला होता.

# महाराणी ताराबाई विद्यालयाचे क्रीडाशिक्षक उत्तरेश्वर धस यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडाशिक्षक उत्तरेश्वररावजी धस सर यांनी ३२ वर्ष ०४ महिने २८ दिवस प्रदीर्घकाळ विद्यालयांमध्ये ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून वयोमानानुसार शनिवार दि.३०नोव्हेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळ्याचा कार्यक्रम विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच सौ.सुलोचनाताई आंधळे तर प्रमुख अतिथी म्हणून उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,उपसभापती अनिलदादा चोले,संचालक पांडुरंग अंडील,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकररावजी धस,कोषाध्यक्षा सौ.जिजाबाई धस,सेवानिवृत्त मुख्याध्यापक डोईफोडे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक उद्धवरावजी सांगळे,नगरसेवक सतीष बप्पा बडे,युवा नेते अमोलराजे आंधळे,संचालक रणजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे, विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर अदिजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. चंदना कापले,वैष्णवी यादव, आकांक्षा गावडे या विद्यार्थिनींनी स्वागतगीत गाऊन सर्व मान्यवर व उपस्थितांचे स्वागत केले.विद्यालयातील विद्यार्थिनी कु.राधिका निरडे,कु.शिंदे अंकिता,कु.झाडे निकिता यांनी धस सर यांच्या बद्दल आपल्या शाळेतील आठवणी सांगितल्या तसेच श्रीमती संजिवनीताई आंधळे व ठोंबरे सर,माजी नगरसेवक सतीषबप्पा बडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून धस सरांना सेवापूर्ती निमित्त शुभेच्छा दिल्या. क्रीडा शिक्षक उत्तरेश्वर(अप्पा) महादेव धस सर यांना सेवापूर्ती निमित्त जोड आहेर व सन्मानपत्रक विद्यालयाच्या वतीने भेट देऊन सहपत्नीक सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष व मान्यवर,संस्थेचे पदाधिकारी, विद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य,पर्यवेक्षक यांच्या हस्ते करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती धस सर म्हणाले की, शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी त्यांच्या उज्वल भविष्यासाठी काम करत असताना अनेक अडचणी आल्या त्यावर मात करून आम्ही यशस्वी झालोत शाळेने मला खूप काही दिल आहे शाळेला आणि विद्यार्थ्यांना मी कधीही विसरू शकत नाही आज माझ्या एका डोळ्यात आनंद तर एका डोळ्यात अश्रू आहेत असे ते म्हणाले तसेच संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांनी शाळेच्या प्रगतीसाठी क्रीडा क्षेत्रामध्ये भरीव योगदान दिल्याबद्दल धस सरांन बद्दल कर्तज्ञता व्यक्त करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय समारोपपर विचार व्यक्त करताना माजी आमदार केशवदादा आंधळे म्हणाले की,शाळेच्या प्रगतीसाठी धस सरांचे भरीव योगदान आहे ते कधीही आम्ही विसरू शकणार नाहीत शाळेचे नावलौकिक क्रीडा क्षेत्रामध्ये त्यांनी केलेल आहे असे गौरव उद्गार काढून त्यांना शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू आंधळे सर यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार प्रा.मुंडे सी.व्ही.यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वृक्ष लागवड करून केले अस्थीचे विसर्जन

**परळी । प्रतिनिधी**

आईचं जगणं अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले जिद्दीने संसार पोरांना संस्काराचे धडे दिले भालेराव कुटुंबातील . सदस्यांनी रक्षा विसर्जीत न करता वृक्षारोपण करून आदर्श निर्माण केला आहे.



टोकवाडी येथील शकुंतला पांडुरंग भालेराव, यांचे नुकतीच निधन झाले होते . सावडण्याच्या दिवशी अस्थि विसर्जन, प्रचलित पद्धतीप्रमाणे नदीपात्रात करतात परंतु विसर्जन पाण्यात न करता एक झाड लावून त्यामध्ये अस्थि व राख विसर्जन करत, दिवंगत व्यक्तीच्या स्मृती जतन कराव्यात, यासाठी जनजागृती केली आहे. भालेराव कुटुंबातील दिलीप भालेराव मुकिंद बनसोडे मुलगी ज्योती शिंदे रत्नमाला शिंदे मुलगा संतोष भालेराव तसेच परिवारातील सामाजिक जाणिवेतूनसामाजिक जाणिवेतून या उपक्रमाला प्रतिसाद देत लावून अस्थि विसर्जन केल्या. यावेळी डॉ. बाबासाहेब शिंदे.पंडित रोडे भरत रोडे अविनाश शिंदे प्रशांत साळवे.मुंडे परिवारासह परिसरातील नागरिक महिला उपस्थित होत्या

# राजकीय विश्लेषक बाबा घोडके यांचा अंदाज खरा ठरला गेवराई मतदार संघासह राज्यातील अंदाज अचूक

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील सावता नगर येथील सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते बाबासाहेब घोडके हे गेल्या १० ते १२ वर्षांपासून अभ्यासपूर्ण लेखी राजकीय अंदाज काढत असून आता पर्यंत त्यांनी वर्तवलेले जवळपास सर्वच अंदाज अचूक ठरत असून नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत गेवराई मतदार संघासह राज्यात बहुमताने महायुती सरकार सत्तेवर येणार असल्याचे त्यांनी अनेकांना लेखी कळवले होते त्यानुसार त्यांचा अंदाज अचूक ठरला असल्याने त्यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



बाबासाहेब घोडके हे निवडणूक काळात राजकीय घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून आपले सोर्स वापरून व जनतेत जाऊन हे राजकीय अंदाज लावतात त्यानुसार त्यांचे अनेक अंदाज खरे ठरत असल्याने गेवराई शहरातील मित्र परिवारात ते कायम चर्चेत असतात आता पर्यंत त्यांनी लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, ग्रामपंचायत यासह विविध निवडणुकीचे अंदाज लावून ते आपल्या मित्र परिवाराला लेखी प्रत देऊन विश्वास व्यक्त करतात. आतापर्यंत त्यांनी अनेक निवडणुकीत काढलेले अंदाज अचूज ठरत असल्याने राजकीय अंदाजाबाबतचे ते एक अभ्यासू विश्लेषक म्हणून ओळखले जाऊ लागल्याने निवडणूक काळात त्यांना अनेक जण संपर्क करून अंदाज घेतात. दरम्यान नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी गेवराई मतदार संघातून महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित हे विजयी होतील व राज्यात बहुमताने महायुतीचेच सरकार येणार असल्याचे अनेकांना लेखी दिले होते, त्यांचा हा अंदाज अचूक ठरल्याने बाबासाहेब घोडके हे नाव चांगलेच चर्चेत येत असून त्यांचे सर्व पत्रकार बांधव, मित्र परिवारासह सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि. २ डिसेंबर २०२४


# ऊसदर जाहीर होण्याबाबत शेतकऱ्यांची अपेक्षा फोल

पुणे : विधानसभेच्या रणधुमाळी दरम्यान ऊस गाळप हंगामाला सुरवात झाली. निकाल लागून आठवडा संपत आला तरी अद्याप ऊसदर जाहीर न झाल्याने निवडणूक निकालानंतर ती जाहीर होण्याची शेतकऱ्यांची अपेक्षा फोल ठरली आहे. तर ऊसदर कधी जाहीर होणार, किती ऊसदर जाहीर होणार याबाबत जिल्ह्यातील साखर कारखानदारांशी संपर्क साधला असता सर्वांनीच याप्रश्नी चुप्पी साधल्याने केवळ चालढकल सुरू असल्याचे चित्र आहे.

केंद्र सरकारने पुणे विभागासाठी १०.२५ टक्के आधारभूत साखर उतारा निश्चित केला आहे. त्यानुसार प्रतिक्विंटल ३४० रुपये किफायतशीर दरानुसार प्रतिटन तीन हजार ४८५ रुपये दर ठरविला आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात जिल्ह्यातील विठ्ठल व विठ्ठलराव शिंदे या दोन्ही साखर कारखान्यांनी प्रतिटन साडेतीन हजार रुपये दर देण्याचे जाहीर केले आहे. जिल्ह्यातील अन्य



साखर कारखान्यांनीही तेवढा दर द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच धुराडे पेटून १५ दिवस होऊनही कारखानदारांनी ऊसदराबाबत मौन बाळगल्याने लवकर ऊसदर जाहीर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. याबाबत शेतकरी संघटनाही मूग गिळून गप्प असल्याची भावना व्यक्त करीत ऊसदर जाहीर केल्याशिवाय ऊसाला कोयता लावू देणार नाही, अशी भूमिका शेतकरी घेत आहेत.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील साखर कारखानदारांशी संपर्क साधला असता अद्याप कोणीही दर निश्चित न केल्याचे चित्र आहे. कष्टकरी शेतकऱ्यांचा ऊस कारखान्यात गाळपाला येत असतानाही त्याबाबतचे त्यांचे मौन संतापजनक आहे. विशेष म्हणजे बैठका घेऊ, चर्चा करू, मग ठरवू, जिल्ह्यातील इतर कारखाने किती देतात तेवढे देऊ, अशी उत्तरे कारखान्याशी संबंधित जबाबदार मंडळींनी दिली. यावरून एकूणच कारखानदारांची चालढकल भूमिका असल्याचेच दिसते.

# जनावरांमधील त्वचा विकारांवर कडूनिंब, हळद उपयुक्त



जनावरांमध्ये विविध प्रकारांतील त्वचा विकार मोठ्या प्रमाणात आढळतात. त्वचा विकाराचे प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांचे जनावरांच्याकडे दुर्लक्ष आणि विकाराचे अयोग्य निदान आणि उपचार हे आहे. शेतकऱ्यांनी प्राथमिक स्वरूपातील त्वचा विकाराचे निदान आणि उपचारदेखील पशुवैद्यकाद्वारा करावेत. त्वचेवर एखादा चट्टा किंवा पुरळ येतात, त्या भागास खाज सुटणे, गोठ्यातील भिंतीस अथवा खांबास जनावर अंग घासते, त्वचा रोगग्रस्त भाग लाल होतो. ही त्वचा विकाराची सुरवातीची लक्षणे आहेत. यावर योग्यवेळी उपचार न केल्यास जिवाणूंचा संसर्ग होऊन या आजाराची तीव्रता वाढते. त्वचा विकारांवर उपचार करण्यापूर्वी त्याचे योग्य निदान होणे आवश्यक आहे. परोपजीवी जंतूंमुळे होणाऱ्या त्वचाविकाराची अनेक कारणे आहेत. उपयुक्त औषधी वनस्पती : कडूलिंब – लिंबोळी, कडूलिंबाची पाने औषधीत वापरतात. कडूलिंबाचे तेल हे त्वचा विकारांवर अत्यंत गुणकारी आहे. कडूलिंबांमध्ये जीवाणू, परोपजीवी जंतू व बुरशी विरोधी गुणधर्म असल्यामुळे जवळपास सर्व प्रकारांतील त्वचा विकारांत कडूलिंबाचा अत्यंत चांगला उपयोग होतो. कडूलिंबामुळे बाह्य परोपजीवी उदा. उवा, गोचिड इ. देखील कमी होतात, त्यामुळे त्वचा विकाराचा प्रादुर्भावदेखील कमी होतो. कडूलिंबाचे तेल त्वचा विकारांवर बाहेरून लावावे.

करंज – करंज किंवा करंजी या नावाने ही वनस्पती ओळखली जाते. करंजीच्या तेलातदेखील परोपजीवी जंतुविरोधी व बुरशीविरोधी गुणधर्म आहेत. करंजी तेलाचा वापर बाह्योपचाराकरिता करावा.अर्जुन – अर्जुन हा मोठा वृक्ष आहे. याची साल त्वचा विकार आणि रक्तस्रावावर गुणकारक आहे. याच्या सालीचा वापर बाह्योपचराकरिता करावा. हळद – हळदीमध्ये जिवाणूविरोधी गुणधर्म आहेत, तसेच हळद सूजविरोधी व दाहनाशक म्हणूनही अत्यंत उपयुक्त आहेत. हळकुंडाची पावडर, कडूलिंब, करंज तेलात मिसळून त्वचा विकारांवर लावावी. कन्हेर – ही वनस्पती फुलांसाठी प्रसिद्ध आहे. वनस्पतीची पाने व मूळ ओले असताना ठेचून त्याचा लेप त्वचा विकारांवर द्यावा. या उपचारामुळे बाह्योपरोपजीवींचेदेखील नियंत्रण होते. तुळस – तुळशीची पाने, मंजुळा अथवा यापासून काढलेले तुळशीचे तेल यात जीवाणू व बुरशी विरोधी गुणधर्म आहेत. कन्हेरप्रमाणेच पाने व मंजुळा ठेचून त्याचा लेप त्वचा विकारांवर द्यावा अथवा तुळशीच्या तेलाचा वापर करावा.

वनस्पतींचा एकत्रित वापर : कडुलिंब तेल – २० मि.लि. करंज तेल – २० मि.लि. अर्जुन – ४ ग्रॅम हळद – ५ ग्रॅम कन्हेर – ३ ग्रॅम तुळस तेल – १० मि.लि. वरील सर्व घटक एकत्र करून दररोज २ ते ३ वेळेस त्वचाविकारांवर लावाव्यात.

# सीताफळ झाडांची निगा कशी राखावी

महाराष्ट्रातील हवामानाचा विचार करता, सिताफळाची लागवड होण्यास भरपूर वाव आहे. अत्यंत कोरडया रखरखीत व उष्ण हवामानाच्या प्रदेशापासून भारी पाऊसमानाच्या हवामाना पर्यंतच्या प्रदेशात सिताफळ वाढते. मात्र उष्ण व कोरडया हवामानातील सिताफळे चविला गोड आणि उत्कृष्ट दर्जाची गुणवत्तेच्या बाबतीत सरस ठरतात असा अनुभव आहे.

कोकणासारख्या जास्त दमटपणा असलेल्या भागाताही हे झाड वाढते. पण अशा हवामानात तेथील फळे आकाराने लहान येतात. कमी पावसाच्या प्रदेशामध्ये डिसेंबर ते फेब्रूवारी या काळात त्याची पान गळती होऊन झाडे विश्रांती घेतात. कडक थंडी व धुके या पिकाला मानवत नाही. थंड हवामानामध्ये फळे घट्ट व टणक राहून पिकत नाहीत. मोहोराच्या काळात कोरडी हवा आवश्यक असते. पावसाळा सुरु झाल्याखेरीज झाडांना फलधारणा होत नाही. सिताफळाचे झाड अवर्षणाला उत्तम प्रतिसाद देत असले तरी अति-अवर्षण मात्र या झाडाला अपायकारक ठरते. साधारणपणे झाडाच्या वाढीसाठी ५०० ते ७५० मिमि पाऊस आवश्यक असतो.

सिताफळाची लागवड ही अवर्षणग्रस्त भागासाठी शिफारस केली असल्यामुळे हेक्टरी फळझाड कोणत्याही जमिनीत येऊ शकते. अगदी खडकाळ रानापासून ते रेताड जमिनीत सुध्दा सिताफळाचे झाड वाढू शकते. अत्यंत हलक्या माळरानात जशी सिताफळाची वाढ चांगली होत, तशीच ही झाडे शेवाळयुक्त जमिनीत गाळमिश्रीत जमिनीत, लाल जमिनीत तसेच अगदी विस्तृत प्रकारच्या जमिनीतही निकोपपणे वाढतात. मात्र भारी, काळी, पाणी साठवून ठेवणारी अल्कलीयुक्त जमिनी या फळझाडाला अयोग्य ठरतात.

बागेची निगा : सिताफळाची रोपे लावल्यानंतर काही रोपे मेली असतील तर महिन्याचे आत नांग्या भरून घ्याव्यात. तसे शक्य न झाल्यास पुढील वर्षी जून महिन्यापूर्वी नांग्या भराव्यात. खुरपणी करून बागेतील तण काढावेत. रोपे लहान असताना पावसाचा ताण पडल्यास मधून मधून पाणी द्यावे. झाडाची वाढ जोमाने होण्याकरिता व चांगले फळ मिळण्याकरिता छाटणी करावी. छाटणी करताना झाडाला योग्य वळण सुरुवातीच्या वाढीच्या काळात द्यावे. त्यासाठी झाडावरील अनावश्यक फांद्या काढून टाकाव्यात. पावसाचा ताण जास्त पडल्यास १५ ते २० दिवसांनी पाणी द्यावे. बागेमध्ये वेळोवेळी आंतर मशागत करावी.




# गाजर लागवड आणि व्यवस्थापन

गाजर म्हणले की आपल्या डोळ्यासमोर येतो तो सुंदर लाल रंगाचा आणि चवदार गाजराचा हलवा.गाजरा मध्ये व्हिटॅमिन मुबलक प्रमाणात आढळते. गाजराचे कच्चा सॅलडच्या स्वरूपात खूप फायदे आहेत.

हवामान :गाजर पिकासाठी ८ ते २८ अंश सेल्सिअस तापमान योग्य असते. तर जास्त उष्ण असलेल्या भागात त्याची वाढ होत नाही. म्हणजे का जर हे थंड हवामानातील पीक आहे.

जमीन निवड :गाजराच्या पिकासाठी पाण्याचा निचरा होणारी चिकन माती सर्वोत्तम ठरते. त्यात गाजराचे पिक चांगल्या प्रकारे येते. तर पाणी साचलेल्या जमिनीत मुळे कुजण्याची व पीक निकामी होण्याचा धोका राहतो.

लागवड पध्दती :गाजराच्या लागवडीसाठी जमिन खोल उभी आडवी नांगरुन घ्यावी. जमिन सपाट करुन घ्यावी. बी सरीवरंब्यावर पेरावी. दोन वरंब्यातील अंतर ४५ सेमी ठेवावी बियाची टोकून पेरणी करतांना ३० ते ४५ सेमी अंतरावर सरी ओढून दोन्ही बाजूंनी १५ सेमी अंतरावर टोकन पध्दतीने लागवड करावी. पाभरीने बी पेरतांना दोन ओळीत ३० ते ४५ सेमी अंतर ठैवावी आणि नंतर विरळणी करुन दोन रोपातील अंतर ८ सेमी ठेवावे. एक हेक्टर क्षेत्रासाठी गाजराचे सुमारे ४ ते ६ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाणे उगवून येण्यास पेरणीनंतर १२ ते १५ दिवस लागतात.



पेरणीपूर्वी बियाणे २४ तास पाण्यात भिजत ठेवल्यास हा काळ कमी करता येतो.

जमीन मशागत व शेण खत टाकणे : गाजर पिकासाठी निवडलेल्या शेतात शेणखत टाकणे अत्यंत महत्त्वाचे असते.कारण त्यामुळे शेतातील उत्पादनही वाढते. शेणखत टाकण्याआधी जमीन २ ते ३ वेळा नांगरणी करून व्यवस्थित भुसभुशीत करून घ्यावी.शेवटच्या नांगरणीच्या वेळी हेक्टरी ३५ टन शेणखत वापरल्यास गाजरांचे चांगले उत्पादन होण्यास मदत होते.

गाजराच्या सुधारित जाती : १.पुसा केसर २.पुसा मेघालय ३.गाजर २९ ४.हिसार रसाळ

सिंचन व्यवस्थापन : गाजराच्या पिकासाठी ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देणे फायदेशीर ठरते. तर यासाठी पाण्याचा निचरा होणारी व्यवस्था शेतात असली पाहिजे.

खत व्यवस्थापन : गाजर पिकासाठी मुख्यत ३ खतांची आवश्यकता असते. १. पोटॅश २.डॅप ३.नायट्रोजन गाजर लागवडीच्या वेळी या खतांचा वापर ३० किलो नत्र व ३० किलो पालाश प्रति हेक्टरी खत म्हणून वापरावा.

खर्च व उत्पादन : एक हेक्टर क्षेत्रामधून गाजराच्या काही जाती पासून १५० क्विंटल पर्यंत उत्पादन निघू शकते. गाजर पिकास तयार होण्यास ७० ते ७५ दिवसांचा कालावधी लागतो. तर १ किलो गाजर पिकवण्यासाठी ६ ते ८ रुपये खर्च येतो.तर एखाद्या व्यक्तीने १ किलो गाजर पिकवले तर त्याची किंमत ७ ते ८ रुपये असते.

कीड रोग आणि त्यांचे नियंत्रण : गाजराच्या पिकावर साडया भुंगा (कॅरट विव्हिल) सहा ठिपके असलेले तुडतुडे आणि रूटफलाय या किडीचा उपद्रव होतो. सोंडया भुंगा आणि तुडतुडे या किडींच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात १० मिली मेलॅथिऑन मिसळून फवारावे. गाजरावर रूटफलाय या किडीची प्रौढ माशी गर्द हिरव्या ते काळसर रंगाची असते. या किडिच्या अळया पिवळसर पांढऱ्या रंगाच्या असून त्या गाजराची मुळे पोखरुन आत शिरतात आणि आतील भाग खात त्यामुळे गाजराची मुळे वेडीवाकडी होतात आणि कुजतात. गाजराची पाने सुकतात. या किडीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात ३ मिली डायमेथॉएट मिसळून फवारावे. गाजराच्या पिकावर करपा, भुरी, मर पानांवरील ठिपके इत्यादी रोगांची लागण होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४०२ : लाइपझिग विद्यापीठ सुरू झाले.
१८०४ : नेपोलियन बोनापार्ट चा फ्रांस म्हणून राज्याभिषेक केला होता.
१८४८ : फ्रान्स जोसेफ ऑस्ट्रियाचे प्रथम सम्राट बनले.
१८५५ : भारताचे राष्ट्रीय काँग्रेस चे अध्यक्ष एन.जी. चन्दावरकर यांचा ला जन्म.
१९११ : जॉर्ज पंचम आणि क्वीन मैरी हे ब्रिटेन चे पहिले भरतात येणारे राजा राणी होते.
१९४२ : योगी अरविंदांच्या अरविंद आश्रमाची पॉडिचेरी येथे स्थापना झाली.
१९४२ : एनरिको फर्मी याने प्रथमच शिकागो येथील अणूभट्टीत अणुविभाजनाची शृंखला अभिक्रिया नियंत्रित करण्यात यश मिळवले. यामुळे अणूऊर्जेचा विधायक उपयोग करण्याचे दालन खुले झाले.
१९७१ : अबू धाबी, अजमान, फुजैराह, शारजाह, दुबई आणि उम-अल-क्वैन यांनी मिळून युनायटेड अरब एमिरातसची स्थापना केली.
१९७६ : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाचे अध्यक्ष झाले.
१९८४ : राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस.
१९८८ : बेनझीर भुट्टो यांनी पाकिस्तानच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. कोणत्याही मुस्लिम राष्ट्राच्या पंतप्रधान बनणार्या त्या पहिल्या महिला होत.
१९८९ : भारताचे ७ वे पंतप्रधान म्हणून विश्वनाथ प्रताप सिंग यांनी सूत्रे हाती घेतली.
१९९९ : काळा पैसा अधिकृत व्यवहारात आणण्यास प्रतिबंध करणारे आणि परकीय चलन व्यवस्थापन करणारे ही दोन विधेयके लोकसभेत मंजूर
२००१ : एन्रॉन कंपनीने दिवाळखोरी जाहीर केली.
२००५ : पाकिस्तान सरकार ने धार्मिक द्वेष पसरविणाऱ्या मदरस्यांवर तसेच साहित्यावर बंदी आणून त्या साठी कायदा निर्माण केला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५५ : सर नारायण गणेश चंदावरकर – कायदेपंडित, समाजसुधारक, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश (१९०१ –१९१२), मुंबई विधानपरिषदेचे बिनसरकारी अध्यक्ष (१९१९), डिप्रेस्ड क्लास मिशनचे अध्यक्ष (१९०६), इंदूर संस्थानचे मुख्यमंत्री, प्रार्थना समाजाचे प्रमुख (१८९६), सोशल कॉन्फरन्सचे प्रमुख सचिव (१९०१) आणि काँग्रेसचे एक संस्थापक व आजीव सभासद (मृत्यू: १४ मे १९२३ बंगळुरू, कर्नाटक)
१८८५ : यकृत आणि यकृताच्या स्रावांचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ जॉर्ज रिचर्ड यांचा जन्म.
१८९८ : इन्दर लाल रॉय – पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट (मृत्यू: २२ जुलै १९१८)
१९०५ : अनंत काणेकर – चतुरस्त्र साहित्यिक, कवी व पत्रकार, 'पद्मश्री' व 'सोविएत लँड नेहरू पुरस्कार' विजेते (मृत्यू: ४ मे १९८०)
१९१२ : भारताचे दक्षिणात्य चित्रपट सृतीतील प्रसिद्ध निर्माता बी नागी रेड्डी यांचा जन्म.
१९१३ : दत्ता उर्फ दादा धर्माधिकारी – चित्रपट अभिनेते व दिग्दर्शक (सतीची पुण्याई, धाकटी मेहुणी, भक्त पुंडलिक, नसती उठाठेव, मुझे सीने से लगा लो, सतीचे वाण, थांब लक्ष्मी कुंकू लावते, वैशाख वणवा, सुभद्रा हरण, क्षण आला भाग्याचा, सप्तपदी इ. अनेक चित्रपट) (मृत्यू: ३० डिसेंबर १९८२ पुणे)
१९३७ : मनोहर जोशी – लोकसभेचे सभापती, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री
१९३९ : भारतीय चित्रपट सृष्टीच्या पटकथाकार आणि साहित्यिक अचला नगर यांचा जन्म.
१९४२ : मुक्तांगणच्या संस्थापिका डॉ. अनिता अवचट यांचा जन्म.
१९४४ : कोसोवो देशाचे पहिले अध्यक्ष इब्राहिम रुगोवा यांचा जन्म. (मृत्यू: २१ जानेवारी २००६)
१९४७ : धीरज परसाना – क्रिकेटपटू
१९५९ : बोम्मन ईराणी – अभिनेता
१९६३ : भारतीय वंशाचे अमेरिकी शास्त्रज्ञ शिवा अय्यदुरई यांचा जन्म.
१९७२ : भारतीय क्रिकेटपटू सुजित सोमसुंदर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५९४ : गेरहार्ट मरकेटर – नकाशाकार, गणितज्ञ आणि तत्त्वज्ञ (जन्म: ५ मार्च १५१२)
१९०६ : बाळाजी प्रभाकर मोडक – 'कालजंत्री'कार, शालिवाहन शक व तिथी आणि ख्रिस्ती सन यांचा मेळ घालण्याचे कोष्टक तयार करणारे, विज्ञानप्रसारक, लेखक (जन्म: २१ मार्च १८४७)
१९१८ : भारताचे प्रसिद्ध न्यायाधीश गुरुदास बॅनर्जी यांचे निधन.
१९९५ : कॅनडा च्या प्रसिद्ध कादंबरीकर राबर्टसन डेविस यांचे निधन.
१९९६ : एम. चेन्ना रेड्डी – आंध्र प्रदेशचे ११ वे मुख्यमंत्री, उत्तर प्रदेशचे राज्यपाल (१९७४ १९७७), पंजाबचे राज्यपाल
१९८० : चौधरी मुहम्मद अली – पाकिस्तानचे ४ थे पंतप्रधान (जन्म: १५ जुलै १९०५) १९८२ १९८३): राजस्थानचे राज्यपाल (१९९२ १९९३), तामिळनाडूचे राज्यपाल (१९९३ १९९६) (जन्म: १३ जानेवारी १९१९ पेड्डामंगलम, मोईनाबाद, आंध्र प्रदेश)
२०१२ : भारतीय चित्रपट सृष्टीची कलाकार प्रीती गांगुली यांचे निधन.
२०१४ : महाराष्ट्राचे ८ वे मुख्यमंत्री ए आर अंतुले यांचे निधन. (जन्म: ९ फेब्रुवारी १९२९)
२०१४ : भारतीय चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध कलाकार देवेन वर्मा यांचे निधन.

# पवनचक्की कंपन्यांकडून बालाघाट परिसरातील शेतकऱ्यांची पिळवणूक-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

आमदारांच्या वरदहस्तामुळे पवनचक्की कंपन्यांकडून बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू आहे. आर्थिक हितसंबंधातून पवनचक्की कंपन्यांना आमदारांचे पाठबळ मिळत आहे. परंतु बालाघाटवरील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी पुढे येऊन तक्रारी कराव्यात, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान, अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

बीड तालुक्यातील बालाघाटावरील १०-१२ गावांच्या परिसरात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे. हे काम करणाऱ्या कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांसोबत अरेरावीची भाषा करतात. कंपन्यांनी शेतीमध्ये टॉवर उभारले असून या टॉवरवरील तारा ओढताना पिकांचे नुकसान झाले. त्याची शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची भरपाई दिली मिळत नाही. तसेच, टॉवर व विद्युत तारांमुळे बाधित होणाऱ्या शेतीची नुकसान भरपाई कंपनीने निश्चित केलेली नाही. त्यामुळे ही भरपाई देण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित होते. तसेच, कंपनीकडून यापूर्वी शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्यापोटी चेक दिलेले आहेत, त्यापैकी अनेक



## यापूर्वीही जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार; ठोस कार्यवाहीची शेतकऱ्यांना अपेक्षा


डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासमवेत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन काही महिन्यांपूर्वी पवनचक्की कंपन्यांच्या गैरकारभाराबाबत तक्रार केली होती. त्याअनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु आमदारांचे आर्थिक हितसंबंध असल्याने कंपन्यांविरोधात अद्याप ठोस कार्यवाही होऊ शकलेली नाही.

चेक बाऊन्स झालेले असून ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. अशी अनेक प्रकरणे असताना कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांना अरेरावीची भाषा करतात आणि आमदार बघ्याची भूमिका घेतात. यावरून कंपन्यांचे आमदारांशी आर्थिक हितसंबंध आहेत, हे स्पष्ट होते. असे असले तरी कोणत्याही शेतकऱ्याची पिळवणूक होत असल्यास माझ्याशी संपर्क करून तक्रारी द्याव्यात. आपण पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा करू, असेही पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## बीडमध्ये मोफत कृत्रिम हात, पाय वाटप होणार

बीड। प्रतिनिधी

स्वातंत्र्यसैनिक, सहकारी चळवळीतील अग्रणी नेते देशभक्त पद्मश्री डॉ. रत्नाप्पा कुंभार यांच्या पुण्यस्मृती निमित्त कुभार समजा विकास संस्था, बीड व साधु वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबर पासून निर्मित अत्यंत हलके व मजबूत कृत्रिम हात व पाय पूर्ण पणे मोफत बसवले जाणार आहेत. यासाठी गरजूंच्या हात व पायाचे माप घेण्यासाठी रविवार २२ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा, राष्ट्रवादी भवन समोर बार्शी रोड बीड येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व समाजातील गरजवंतांनी नोंदणी करून आपल्या हात व पायाचे माप द्यावे असे आवाहन रामदास कुंभार, चनबस वायकर यांनी केले आहे.



देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांच्या पुण्यस्मृती दिन २३ डिसेंबर रोजी विविध उपक्रमाने साजरा केला जातो. या निमित्त कुभार समाज विकास संस्था बीड च्या वतीने गोर-गरिबांसाठी बीड मध्ये मोफत कृत्रिम हात, पाय वाटप करणार आहे. २२ डिसेंबर रोजी हात व पायाची मापे घेतली जाणार असून मापे घेतल्यानंतर ३० ते ३५ दिवसांनी मोफत अवयव वितरण केले जाणार आहे. गरजवंतांना एकही रूपया लागणार नाही. कृत्रिम हात व पाय लावल्यानंतर मनुष्य चालु शकतो, सर्व दैनंदिन कामे

## थोडक्यात



### पोलिसांनी पकडलेल्या बैलांची अखेर सुटका

बीड । प्रतिनिधी

परळी येथुन १३ ऑक्टोबर रोजी बैल घेऊन जाणारा टेम्पो पोलिसांनी पकडून कारवाई करण्यात आली होती ती आज दिनांक ३० नोव्हेंबर रोजी घेऊन जाणाऱ्या बैलांची सुटका झाली आंबेजोगाई जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांच्या आदेशामुळे हैद्राबाद येथे कत्तलिसाठी जात असलेल्या १७ नंदिना मिळाले अभयदान १३ ऑक्टोंबर २०२४ रोजी परळी येथील गोरक्षक दल यांनी पोलिस प्रशासन च्या सहकार्य ने हैद्राबाद येथे कत्तलिसाठी गोवंश घेवून जाणाऱ्या टेम्पो वरती कायेदशिर कार्यवाही करीत गुन्हा नोंद केला व १७ नंदिना श्री रतन जी कोठारी यांच्या रामरक्षा गोशाळा भोपला, परळी येथे पुढील संगोपण साठी वर्ग केले .गुन्ह्यात कसाया तर्फे परळी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब न्यायालय येथे अर्ज दाखल केला असता त्यात त्याचा अर्ज अटी व शर्ती सह मंजूर करीत जप्त नंदी हे कासायाच्या ताब्यात देण्याबाबत आदेश केला या आदेशाला आव्हान देत आंबाजोगाई येथे जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांच्याकडे अर्ज केला असता न्यायालयाने स्थगिती दिली व १७ नंदिना अभयदान दिले सदर प्रकरणात गोशाळा तर्फे ऍड अशोक मुंडे यांनी बाजु मांडली तर यांना सहकार्य, मार्गदर्शन अशोक जैन साहेब ,ऍड राजू गुप्ता मुंबई, सचिन दादा, ऍड शिवानीजी , ऍड हाके पाटील,ऍड सावित्री दहिफळे, यांनी केले तसेच राजु भाई शहा, वर्धमान संस्कार धाम मिलिंद भाऊ एकबोटे, शिवशंकर जी स्वामी यांनी देखील विशेष साह्य केले

### मुख्याध्यापक पदोन्नती तात्काळ करा – कास्ट्राईब

बीड। प्रतिनिधी

जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्राथमिक मधील मुख्याध्यापकांच्या पदोन्नती तात्काळ कराव्यात असे निवेदन कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाकडून माननीय शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांना प्रत्यक्ष भेटून दिले व त्यांच्या बरोबर चर्चा केली . वास्तविकपणे मुख्याध्यापक पदोन्नती, शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती, केंद्र प्रमुख पदोन्नती करण्यात याव्यात यासाठी ऑगस्ट महिन्यामध्ये पदोन्नती संघर्ष समितीकडून आमरण उपोषण करण्यात आले होते . उपोषणावेळी मुख्याध्यापक पदोन्नती अंतिम यादी ३० ऑगस्ट पूर्वी प्रसिद्ध करून पदोन्नती करण्यात येईल असे लेखी आश्वासन प्रशासनाकडून पदोन्नती संघर्ष समितीला दिले होते .आचारसंहिते पूर्वी मुख्याध्यापक पदोन्नती पात्र शिक्षक सेवानिवृत्त झाले तसेच दर महिन्याला सेवानिवृत्त होत असल्यामुळे पदोन्नती पासून वंचित राहत आहेत. करिता कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाचे जिल्हाध्यक्ष द .ल .वारे, सचिव – मणियार हकिम, उपाध्यक्ष स्वामी ढोकणे, कोषाध्यक्ष संजय दराडे, जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ तांदळे,प्रभाकर आंधळे,अनिल गोल्हार, तसेच राज्य शाखेचे पदाधिकारी राज्याध्यक्ष अनिल जाधवर,रवींद्र सुतार,प्रकाश अहिरे, अभिजीत तांदळे, बाळासाहेब शिरसाट, मच्छिंद्र राख, अर्जुन बारगजे, भाऊसाहेब हंगे, भगीरथ मस्के इत्यादींनी शिक्षणाधिकारी यांना भेटून पाच डिसेंबर पुर्वी मुख्याधापक पदोन्नती करून पदोन्नती पात्र शिक्षकांना न्याय देण्याची मागणी केली .

## डॉ. योगेश क्षीरसागर यांना विधान परिषदेत घ्यावे –नितीन जोगदंड

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभेत डॉ.योगेश क्षीरसागर यांना अवघ्या ५००० मतांनी निसटता पराभव स्वीकारावा लागला. मात्र बीड मतदार संघाचा विकास करावयाचा असेल तर डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधान परिषदेत संधी द्यावी अशी मागणी नितीन जोगदंड यांनी केली आहे.

बीड मतदारसंघाची निवडणूक ही जातीपातीच्या राजकारणामुळे गाजली. यावेळी विकास कामांच्या मुद्द्यावर मतदान न होता जाती धर्मावर मतदान करण्यात आले. यामुळे डॉ. योगेश क्षीरसागर यांना पराभव स्वीकारावा लागला. डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी मा.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून बीड मतदार संघात अनेक विकासाची कामे झाली. डॉ.योगेश क्षीरसागर आणि डॉ.सारिका क्षीरसागर यांनी अजित दादा पवार आणि धनंजय मुंडे यांच्याकडे मागील एक ते दीड वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणला. त्या माध्यमातून बीड मतदार संघातील शहरी आणि ग्रामीण भागात अनेक विकासाची कामे केल्यामुळे त्यांचा विजय हा निश्चित मानला जात होता.



मात्र बीडच्या काही ठराविक भागातील जनतेने विकासाकडे दुर्लक्ष करत जाती धर्मावर मतदान केल्याचे चित्र स्पष्ट पहावयास मिळाले. राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने महायुतीचे सरकार स्थापन होणार आहे. मात्र त्या सरकार मध्ये बीड चा आमदार सत्तेत नसल्याने बीड चा विकास कुठे तरी संथ गतीने होणार आहे. मात्र बीडच्या विकासासाठी कायमच प्रयत्नशील असणाऱ्या डॉ. योगेश क्षीरसागर यांना बीड मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. अजित दादा पवार साहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कोट्यातील रित्या झालेली विधानपरिषदेच्या जागेवर संधी द्यावी, अशी मागणी नितीन जोगदंड यांनी केली आहे.

## जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी महोत्सवात सहभाग नोंदवावा –विद्यागर

### जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजनासाठी बैठक

बीड। प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ०४ ते ०५ डिसेंबर २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५ ते २९ वयोगटातील जास्तीत जास्त युवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन संदर्भात समिती सदस्य, तज्ज्ञ, परीक्षक यांची बैठक शुक्रवारी (ता.२९) पार पडली. बैठकीस माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी अरुणा कोचुरे, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, तुकाराम पवार, गटशिक्षणाधिकारी श्री . तुरुकमाने आदींची उपस्थिती होती. बैठकीत शिक्षणाधिकारी श्री. शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर यांनी जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजना बाबत उपस्थितांना माहिती दिली. जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना यावर आधारित स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, यात समूह लोकनृत्य , लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम, या कथालेखन , चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता लेखन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात समूह लोकनृत्य स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ७ हजार , द्वितीय ५ हजार, तर तृतीय ३ हजार रुपये देण्यात येणार आहेत. लोकगीत स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ५ हजार, द्वितीय ३ हजार, तर तृतीय २५०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत. बैठकीस जिल्ह्यातील युवा क्षेत्रात काम करणारे दिनकर थोरात, प्रा. दीपक जमदाडे, प्रा. राम गव्हाणे, प्रा. सोपान सुरवसे, प्रा. केशव भागवत, प्रा.एस.एस.राऊत , प्रा .डॉ. रवींद्र काळे , श्री .व्ही. बी ठोंबरे श्री. आर. एस .इंगळे आदींची उपस्थिती होती. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे यशस्वीतेसाठी क्रीडा अधिकारी अनिकेत काळे , कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गर्शक सतीश राठोड, रेवननाथ शेलार, अविनाश पाटील, धनेश करांडे, जितेंद्र आराक, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, राजेश बागलाने, मंगेश वडमारे आदी पुढाकार घेत आहेत.

## खोलेश्वर विद्यालय,अण्णाभाऊ साठे इंग्लीश स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन

दिंद्रुड। प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालय व अण्णाभाऊ साठे इंग्लीश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी उत्साहात साजरे झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी कलागुणांचा कलाविष्कार सादर केला. प्रसंगी पालक वर्ग मंत्रमुग्ध झाल्याचे पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी कलाविष्कार या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या वतीने शनिवारी सायंकाळी करण्यात आले होते. सुमारे साडेचारशे विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या नृत्य,गायन, नाटिका या कार्यक्रमात सादर केल्या. देशभक्तीपर



गीते, प्रबोधन पर नाटिका पाहताना प्रेक्षक मंत्रमुग्ध झाल्याचे पाहायला मिळाले. साडेतीन तास चाललेल्या कार्यक्रमास प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांना दाद दिली. संस्थेचे अध्यक्ष दिलीप पारेकर, विलास पारेकर, मुख्याध्यापिका सरिता फपाळ, मुख्याध्यापक संजय रायते, रोहिणी पारेकर, स्नेहसंमेलन प्रमुख सविता कोळसे यांच्यासह शिक्षक वृंदांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

स्नेहसंमेलन म्हटले की सत्कार भाषण व नृत्य कलाविष्कार असा ठरलेला कार्यक्रम असतो, यात बराच अंशी वेळ औपचारिक भाषणात जातो मात्र खोलेश्वर विद्यालयाने आयोजित स्नेहसंमेलनात केवळ विद्यार्थ्यांचे कलाविष्कार सादर केल्याने उपस्थित प्रेक्षकांनी व पालकांनी शाळेचे अभिनंदन केले.देवा श्रीगणेशा , मेरे माँ के बराबर कोई नहीं ,बेटी हिंदुस्थान की या गाण्यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली. 'उमगया बाप रं' या पाल्यांच्या मनात आपल्या वडिलांबाबत वडिलांनी केलेल्या पाल्यांचे संगोपण आणि झेललेले कष्ट याबाबत सादर केलेली नाटिका प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी आणणारी ठरली.

## ई–पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपद्वारे होणार

बीड। प्रतिनिधी

रब्बी हंगाम एक डिसेंबर २०२४ पासून राज्यात सुरू होत आहे. शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्यासाठी आधी ई–पीक पाहणी मोबाईल ॲप उपलब्ध होते. परंतु आता केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे काही तांत्रिक दुरूस्ती करून नवीन रूपात ई–पीक पाहणी मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या नंतर १०० टक्के पीक पाहणी सुधारित ई–पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे संपूर्ण राज्यात होणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी आपली पीक पाहणी ठराविक मुदतीत करून घ्यावी. जेणेकरून कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचण येणार नाही, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून केले आहे.

शेतकरी स्वत: पिकांची नोंद ई–पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे नोंदवायचे व उर्वरीत पीक पाहणी जे शेतकऱ्यांनी नोंदवलेली नाही, ते तलाठी यांच्यामार्फत होत असत. त्यामध्ये दुरूस्ती करून शेतकऱ्यांना हंगामाच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी करण्यासाठी सहायक यांची नेमणूक करण्यात येत आहे. प्रत्येक गावासाठी सहायक उपलब्ध राहणार असून सहायकामार्फत पीक नोंदणी होणार आहे. पीक विमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद इत्यादी सुविधांचा लाभ घेण्यासाठी ई–पीक पाहणी मोबाईल ॲपमध्ये पिकांची नोंद असणे आवश्यक आहे. नवीन मोबाईल ॲपमधील आवश्यकता पीक पाहणीसाठी निवडलेल्या गट क्रमांकापासून ५० मीटरच्या आत फोटो घेणे अनिवार्य आहे. पिकांचे दोन फोटो घेणे बंधनकारक.सुधारित ॲपमधील नवीन सुविधा शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी हंगाम सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी संबंधित समस्या सोडविण्यासाठी सहायक उपलब्ध असेल, असेही प्रशासनाने कळवले आहे.

## सेंद्रिय शेती योजना प्रभावीपणे राबवणे आवश्यक – राऊत

शिरूर। प्रतिनिधी

बीड जिल्हा यातील वाढते कॅन्सर,व विविध आजारांचे प्रमाण हे मानवी जातीसाठी विनाशक आहेत व या सर्व घटकांचे मुळ हे आपण सेवन करत असलेले धान्य,भाजीपाला,यावरील रासायनिक खते,किटकनाशके यांचा होणारा अतिवापर यामुळे थेट मानवी शरीरात जाऊन आरोग्याचे अनेक दुष्परिणाम होत आहेत.पांरपारीक शेती, सेंद्रिय कार्बन ,कंपोस्ट खते,बियाने यांच्या अभावी रासायनिक खतांचा बेसुमार वापर हा जमीनीचे व मानवी आरोग्य धोक्यात आणत आहे.

यासाठी बीड जिल्ह्यातील सुजाण शेतक–यांनी ,शेतकरी गट,शेतकरी उत्पादक कंपनी–समुहांनी जागृत होऊन पारंपारिक सेंद्रिय शेतीकडे जोमाने वळणे गरजेचे झाले आहे.यासाठी राज्यशासनाने देखील दखल घेऊन सेंद्रिय शेती संबंधी प्रभावी योजना,निधी उपलब्धता करणे,यासाठी पशुधानाचे शेण–मुत्र,सेंद्रिंय कार्ब निर्माण करणारे उत्पादने,त्यासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे आवश्यकता आहे. सकस आहार उपलब्ध करून देण्यासाठी त्यामधील रासायनिक घटकांचे प्रमाण संपुष्टात आणण्यासाठी शेतक–यांना विविध प्रोत्साहन पर नाविण्योयपूर्न योजना, सेंद्रिय शेती मार्गदर्शन शिबारे, प्रशिक्षण–प्रात्क्षिके, बाजारपेठ निर्माण करणे आवश्यक आहे.तरच भविष्यात मानवी समाजाचे अस्तित्व अबाधित राहील.करिता शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या माध्यमातून व्यापक शेतकरी चळवळ उभी करून शासन व कृषिविभागाकडे पाठपुरावा करून सेंद्रिय शेती वाढता वापर अन्नधान्य निर्मीती, बाजारपेठ, पशुधन जोपासना,कंपोस्ट खते,बियाणे निर्मीती साठी प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष शिवराम राऊत यांनी व्यक्त केले आहे.लवकर कृषिआयुक्त यांची भेट घेऊन या संबंधी चळवळ सुरू करण्यात येणार आहे.

# दहा हजार पाण्याचे स्त्रोत आता गावातच तपासणार-जिवने

## ऑनलाइन करण्यासाठी केली पाच कुशल महिलांची निवड

बीड/ प्रतिनिधी

जिल्ह्यातील जवळपास दहा हजार पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत जैविक व रासायनिक दृष्ट्या गावातच तपासणी करून केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन करण्यासाठी पाच कुशल महिलांची निवड करण्यात आलेली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या मदतीने सर्व जलस्त्रोतांची तपासणी होणार आहे. या सर्व उपक्रमाचे सह नियंत्रण गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी करणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील जवळपास दहा हजार पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत असून आरोग्य विभाग ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व पंचायत विभाग यांच्या समन्वयाने पर्यंत रासायनिक व जैविक तपासणी करून तपासणीची नोंद केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर होणार आहे.पिण्याच्या पाण्याचे सर्व स्त्रोत पाणी नमुने जलसुरक्षकांच्या मदतीने प्राथमिक आरोग्य



केंद्रात पोहोचविण्यासाठी प्रत्येक तालुक्याचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला असून त्यांनी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पाणी नमुने प्रयोगशाळेत जात आहे. जिल्ह्यात पाणी तपासणीसाठी आष्टी ,बीड, गेवराई, माजलगाव, परळी तालुक्यात पाच उपविभागीय प्रयोगशाळा आहे . या सर्व प्रयोगशाळा भूजल सर्वेक्षण यंत्रणा कार्यालयामार्फत सनियंत्रित केले जातात प्रत्येक प्रयोगशाळेमध्ये रसायनी व प्रयोगशाळा तंत्रज्ञ असे दोन कर्मचारी उपलब्ध आहे. या विशेष उपक्रमात जल जीवन मिशन अंतर्गत नव्याने निर्माण झालेले स्त्रोत यांचे देखील जिओ टॅग करण्याची मोहीम ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने हाती घेतली आहे. प्रत्येक गावात अंगणवाडी ताई आशा कर्मचारी व बचत गटाच्या सदस्य अशा पाच कुशल महिला व जल सुरक्षकांनी पिण्याचे पाणी नमुने ग्रामपंचायत स्तरावर तपासणी करावी याकरिता पाठपुरावा सुरू असल्याची माहिती विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र मोराळे यांनी दिली आहे.जिल्ह्यातील सर्व विस्ताराधिकारी आरोग्य तसेच पंचायत आरोग्य कर्मचारी , आरोग्य विभागाचे कर्मचारी व जलसुरक्षकांना पंचायत समिती स्तरावर प्रशिक्षण दिले असून या प्रशिक्षणात जलस्त्रोत पिण्याचे पाणी नमुने ऑनलाईन करण्यासाठीची पद्धत समजावून सांगण्यात आलेली आहे प्रशिक्षण घेण्यासाठी जिल्हा साथ रोग वैद्यकीय अधिकारी डॉक्टर पि. के. पिंगळे ,संजय मिसाळ, अमोल कुलकर्णी , साजिद शेख,संदीपान मांडवे,भारत नागरगोजे परिश्रम घेतले आहे.

राज्य लोकतंत्र



# विधानसभा संपली आता बारी स्थानिक स्वराज्य संस्थांची

## कार्यकर्त्यांसाठी स्वतःची निवडणूक समजून काम करेल –आ.संदीप क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

सर्व कार्यकर्त्यांनी झटून काम केले. माझ्या कुटुंबातील व्यक्ती माझ्यासोबत नसतानाही केवळ कार्यकर्त्यांच्या जीवावर मी ही निवडणूक लढवली. थोरामोठ्यांचे आशीर्वाद मिळाले .त्यामुळे मी ही निवडणूक जिंकलो. प्रतिकूल परिस्थितीत कार्यकर्त्यांनी मला यश मिळवून दिले. आता विधानसभा संपली आहे .आता बारी नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेची आहे. या निवडणुकीमध्ये माझ्या स्वतःची निवडणूक असल्यासारखे काम करून कार्यकर्त्यांना निवडून आणेल आणि जिल्हा परिषद ,पंचायत समिती , आणि नगरपालिकेवर आपले वर्चस्व निर्माण करेल .अशी ग्वाही आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड येथील रामकृष्ण लॉन्स मध्ये झालेल्या नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलताना दिली. यावेळी



माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार प्राध्यापक सुनील धांडे, माजी आमदार उषाताई दराडे, काँग्रेसचे पक्ष निरीक्षक रवींद्र दळवी, राजेंद्र मस्के उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ज्या ज्या घटकांनी संदीप क्षीरसागर यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले ते सर्व पदाधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खासदार बजरंग सोनवणे हे होते .

यावेळी सत्काराला उत्तर देताना संदीप क्षीरसागर म्हणाले की माझे सर्व कुटुंब माझ्या विरोधात होते. केवळ अर्जुन क्षीरसागर हे



एकमेव माझ्यासोबत होते. तरीही कार्यकर्त्यांच्या जीवावर ही निवडणूक आपण पार पाडली त्यात यशस्वी झालो आता यापुढे कार्यकर्त्यांची बारी आहे. कार्यकर्त्यांच्या निवडणुकीसाठी सर्व पक्षांना सोबत घेऊन एक दिलाने ही निवडणूक लढवली जाईल .आगामी नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणूक मध्ये कार्यकर्त्यांसाठी माझ्या स्वतःची निवडणूक असल्यासारखे मी काम करेल .कार्यकर्त्यांनी माझ्यासाठी जिवाचे रान केले. मीही कार्यकर्त्यासाठी जिवाचे रान करेल. अशी ग्वाही देत असताना आता स्थानिक स्वराज्य संस्थांचा फंड कोणीही अडवू शकत नाही. सरकारला नियमानुसार हा फंड द्यावाच लागतो. आतापर्यंत फंडासाठी आडवणूक झाली. मात्र आता यापुढे ती आडवणुक होणार नाही.

◀◀ पान ३ वर

### मनोज दादांच्या प्रत्येक आंदोलनात सहभाग

यावेळी बोलताना संदीप क्षीरसागर म्हणाले की मला मनोज दादा जरांगे यांचा मोठा पाठिंबा मिळाला त्यांच्यामुळेच मी आमदार झालो आता यापुढे त्यांच्या प्रत्येक आंदोलनात आपला सहभाग राहणार असून त्यांना कायम पाठिंबा राहील अशी ग्वाही आमदार क्षीरसागर यांनी यावेळी दिली.

# चुंबळी गावात पिण्याच्या पाण्याचा वणवा, विविध योजनेचे पाणी कुणाच्या घशात ?

## तात्काळ कारवाई करावी नसता ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात

**पाटोदा । प्रतिनिधी**

गावकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरवठा करणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य आहे. मात्र पाटोदा तालुक्यातील आदर्श गाव म्हणून पंचक्रोशीत नावारूपाला आलेले चुंबळी हे गाव त्याला उपवाद ठरले असुन गावाला अनेक योजना आल्या मात्र ग्रामपंचायतच्या काही गावपुढाऱ्यांनी अधिकाऱ्यांसोबत संगनमताने कोणतीही योजनेचे पाणी मिळु नये याची योग्य प्रमाणावर काळजी घेतल्याने गावकऱ्यांना तहान व सांडपाण्याची सोय खाजगी कुंपनलिकेवर भागावी लागत असुन त्यामध्ये अनेकदा ग्रामस्थांचे



पाण्यावरून खटके उडु लागली आहेत तर सध्या केंद्र सरकारच्या पुढील २५ वर्षांच्या भविष्याचा विचार करून जल जिवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनेतीत पाण्याची टाकीचे काम पुर्णत्वास आले असुन त्यांचे कनेक्शन आहे त्याच पाईपलाईनला जोडल्याने गावाला पाणीपुरवठा होऊच शकत नाही याची कल्पना ग्रामस्थांना आल्याने व भविष्याचा विचार करता पुढील २५ वर्षे गावाला कोणतेही योजना तसेच पाण्याचा टँकर सुध्दा उपलब्ध होणार नाही तसेच गावात कोणताही पाणी पुरवठा सुरूळीत होईल असे काम झालेले नाही तसेच झाले आहेत तेही निकृष्ट दर्जाचे साहीत्य वापरून करण्यात आले असल्याने गावाला पाणी पुरवठा होईल असे कोणतेही चिन्ह दिसून येत

◀◀ पान ३ वर

# चोभानिमगाव येथील महिलेचा विहिरीत पाय घसरून पडल्याने मृत्यू

## गावासह परिसरावर शोककळा

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील चोभा निमगाव येथील वैशाली उर्फ राणी अमोल सरोदे(वय २५ वर्ष) ही नवविवाहित महिला सकाळी शौचास आपल्या घराच्या जवळील शेतामध्ये गेली असता विहिरीच्या जवळून पुढे जात असताना विहिरीमध्ये पाय घसरून पडल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.



याबाबत सविस्तर माहिती अशी की , शनिवार दि.३०/११/२०२४ रोजी वैशाली सकाळी झोपेतून उठल्यानंतर घरातील मंडळी झोपेत असतानाच शौचास घराच्या जवळील शेतामधील विहिरीजवळून जात होती यावेळी विहिरीला संरक्षण कठडे नसल्याने विहिरीत पाय घसरून पडल्याने तीचा जागीच मृत्यू झाला. वैशाली ही बराच वेळ घरी न दिसल्याने घरातील मंडळींनी तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता , बराच वेळ ती मिळून आली नाही. नंतर आजूबाजूला माहिती मिळाल्यानंतर सर्वांनी तिला शोधण्याचा प्रयत्न केला असता घराच्या जवळील शेतामध्ये विहिरीत सकाळी ११.३० वा. च्या दरम्यान तिचा मृतदेह सापडला. याबाबत कडा पोलीस चौकी येथे याबाबतची माहिती देण्यात आली . यानंतर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शवविच्छेदन करण्यासाठी पाठवण्यात आला. रात्री उशिरापर्यंत शवविच्छेदन करण्यात आले नव्हते कारण तिचे आई-वडील हे कारखान्यावरती ऊस तोडणीसाठी गेले असल्याने त्यांना येण्यास उशीर झाला ते आल्यानंतर सकाळी सर्वांच्या संमतीने शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर रविवारी दुपारी

◀◀ पान ३ वर

# माजलगांवचे नाव देशपातळीवर कुस्तीच्या रूपाने पोहोचवणारा पै. सुमितकुमार भारस्कर - प्राचार्य सानप



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव सारख्या ग्रामीण भागात जन्म घेऊन आई - वडीलांची ईच्छा पूर्ण करण्यासाठी सुमित कुमार भारस्कर अहोरात्र कष्ट करून कुस्तीच्या रूपाने माजलगावचे नाव देशपातळीवर उंचावत असल्याने आनंद होत असल्याचे मत सुंदराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी व्यक्त केले आहे

सुमित कुमार भारस्कर यांनी राज्य व देशपातळीवर होणाऱ्या खेलो इंडिया या अंतर्गत गोल्ड मेडल नुकतेच पटकावले आहे, त्यामुळे त्यांचा सत्कार सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोवर्धन सानप यांनी महाविद्यालयात शिक्षण घेत असल्याने त्यांच्या सत्कार प्रसंगी बोलत असताना व्यक्त केले

यावेळी महाविद्यालयाचे अधीक्षक सतीश एरंडे सर , एकनाथ मस्के सर , सुदर्शन स्वामी सर , दत्ता (भाऊ) कांबळे , आवारे सर, कोरडे सर उपस्थित होते.


# आ.प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा –पोकळे, फपाळ

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट रोजगार सोय रोजगार सेलचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा पोकळे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गट ग्रंथालय बीड जिल्हाध्यक्ष बालासाहेब फपाळ पाटील यांनी माननीय अजित दादा पवार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे तसेच माजलगाव मतदारसंघातील जनतेतून होत असून. नुकतीच माजलगाव विधानसभा निवडणुक झाली असुन माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व







करण्याची संधी दिली आहे. मागील पस्तीस वर्षांमध्ये आमदार प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे मतदारसंघात केली आहेत. तर जलसिंचनाचे अनेक प्रश्न मार्गी लावल्याने मतदारसंघातील बहुतांशी शेतकरी आज घडीला समृध्द झाल्याचे चित्र पाहायला मिळते. त्याचबरोबर माजलगावसह या ठिकाणी एम.आय.डी.सी.ची स्थापना झाली असून येथे असणाऱ्या उद्योगामुळे याठिकाणी सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांच्या पोटापाण्याचा प्रश्न मिटला आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी मतदार संघामध्ये अनेक केलेल्या जनहिताच्या व विकास कामाच्या जोरावरच मतदारसंघातील

◀◀ पान ३ वर

# पेंडगावच्या हनुमान मंदीरात शनि अमावास्यानिमित्त भाविकांची गर्दी



गेवराई । प्रतिनिधी

बीडपासून काही अंतरावर असलेल्या श्री क्षेत्र पेंडगाव येथे शनिवार दि.३० नोव्हेंबर रोजी शनि अमावास्या निमित्त पावन हनुमान मंदीरात भाविकांनी दर्शनासाठी लांबच लांब रांगा करत मोठ्या संख्येने गर्दी केली होती. भक्ताच्या नवसाला पावणारा मारुती म्हणून पेंडगावच्या मारुतीची सर्वत्र ख्याती आहे.

पेंडगाव येथील भक्ताला पावणारा मारुती काशीवरुन आल्याची येथील ग्रामस्थांची श्रद्धा आहे. हा प्रत्येक भक्ताला पावणारा मारुती आहे. या मारुती मंदिराचे खास वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक

◀◀ पान ३ वर

# फ्लाईंग बर्डस् ॲकॅडमीत पालक मार्गदर्शन शिबिर

**माजलगाव । प्रतिनिधी**

फ्लाईंग बर्डस अकॅडमी माजलगाव शाळा येथे दि ३० नोव्हेंबर शनिवार रोजी पालक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे आयोजन फ्लाईंग बड्र्स कार्यक्रमास प्रमुख अतिथी सेलू येथील अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य आबासाहेब सावंत यांनी पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या सारिका बजाज या होत्या यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष पांडुरंगजी चांडक यांनी केले कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ॲड.विष्णू सावंत तसेच हभप हनुमान आहेर पंढरपूरकर यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी सोपानराव पवार,ऐश्वर्या चांडक सौ.माया चांडक संचालक प्रभाकर शेटे,अण्णासाहेब तौर,वसंत पाटील भगवान लाटे जगदीशजी चांडक,राहुल चांडक उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विशेष ॲक्टिव्हिटी साठी मुलांना प्रोत्साहनपर स्टार स्टुडन्ट अवार्ड देऊन



गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी पालकांच्या भूमिकेचे महत्त्व आणि मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये त्यांची जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. तसेच, मुलांच्या शिक्षण, मानसिक आरोग्य आणि तांत्रिक युगातील आव्हाने यावर उपाय सुचवले.शिबिरात पालकांसाठी विशेष सत्र आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये तज्ञांनी शंका समाधान केले. विविध विषयांवर सखोल चर्चा झाली आपल्या पाल्याशी संवाद साधण्याचे कौशल्य मुलांना अभ्यासात गोडी कशी लावावी. तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि मर्यादा इत्यादी विषयावर मार्गदर्शनपर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुळे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन काकडे मॅडम यांनी केले. हा उपक्रम पालक व विद्यार्थ्यांमधील नाते अधिक मजबूत करण्यासाठी एक सकारात्मक पाऊल ठरला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यकामास पालकांनी उपस्थित राहून पालक मार्गदर्शन शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद दिला.

# श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडकासारख्या नाट्य स्पर्धांमुळे सांस्कृतिक चळवळ गतिमान होईल

## डॉ.दीपा क्षीरसागर यांचे प्रतिपादन; राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडकसारख्या स्पर्धांमुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील नाट्याभिनयाची आवड असणाऱ्या युवक - युवतींसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल. त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळेल आणि यातून मराठवाड्याचा सांस्कृतिक विकास होईल. त्यामुळे अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणे हे भूषणावह तर आहेच, तसेच ती त्या-त्या परिसराची गरज देखील आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबईच्या सदस्य तथा अ.भा.म.ना.प. शाखा बीडच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा लातूर व दयानंद महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम



गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी शाखाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, उपाध्यक्ष निलेश सराफ, अजय गोजमगुंडे, कार्यवाह धनंजय बेंबडे, कोषाध्यक्ष अमोल नानजकर, सहकार्यवाह उमाकांत हुरदुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, साहित्य, नाट्य, संगीत, कला, आदी बाबींवरून प्रदेशाची सांस्कृतिक ओळख निर्माण होत असते. मराठवाड्यामध्ये कलाकारांची खाण आहे असे म्हटले जाते. याच मराठवाड्याने राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्लीचे माजी संचालक

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# युगेंद्र पवार पुन्हा ॲक्शन मोडमध्ये! सुरू केला आभार दौरा; मत पडताळणीबाबत केलं मोठं वक्तव्य

**बारामती । प्रतिनिधी**

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बारामती मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांचा मोठ्या मताधिक्यांने पराभव झाला. युगेंद्र पवार यांची ही पहिलीच निवडणूक होती. त्यामध्ये युगेंद्र पवारांना ८०,४५८ इतकी मते मिळाली आहेत. अजित पवारांना १,९६,६४० मते मिळाली. विधानसभा निवडणुकीत अजित पवार १,१६,१८२ मतांनी विजयी झाले आहेत. त्यानंतर आता युगेंद्र पवार पुन्हा एकदा क्शन मोडमध्ये आले आहेत. बारामती विधानसभा मतदारसंघातून युगेंद्र पवारांचा पराभव झाल्यानंतर युगेंद्र पवारांनी बारामती विधानसभा मतदारसंघात आभार दौरा काढलेला आहे.



या आभार दौऱ्याच्या माध्यमातून ते गावोगावी जाऊन मतदारांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानत आहेत. या दौऱ्याची सुरुवात त्यांनी काटेवाडी मधून केली. तर दुसरीकडे अजित पवारांचं अद्यापपर्यंत अभिनंदन केलं नाही, परतु तुमच्या माध्यमातून अभिनंदन करतो. सातत्याने त्यांना दिल्लीला जावं लागत आहे. त्याच्यामुळे वेळ भेटला नाही, ज्यावेळेस भेटतील त्यावेळेस मी त्यांचे अभिनंदन करेल असा खोचक टोला युगेंद्र पवार यांनी अजित पवारांना लगावला आहे. तर तसेच त्यांनी मत पडताळणीवरून निवडणूक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. या निवडणुकीत पैशाचा वापर झाला. दहशतीचे वातावरण होतं असा आरोप देखील युगेंद्र पवार यांनी केला आहे.

अजित पवार यांचं मी अभिनंदन करतो आणि निवडणुका म्हटलं तर हार-जीत हे होत असत. आमची पहिली वेळ होती. आम्ही निष्ठेच्या बाजूने आणि सत्याच्या बाजूने उभे राहिलो. आमचे सर्व कार्यकर्ते हे नवीन आहेत. सर्वजण तरुण आहेत. तरीदेखील आम्ही सर्वांनी चांगली टक्कर दिली आणि सर्वत्र परत एकदा गेलं पाहिजे अशी भावना आमच्या सर्वांची होती. त्या लोकांनी आम्हाला मदत केली आणि ज्या लोकांनी मदत केली नाही. तिथे परत एकदा त्यांच्या गावात जाऊन भेट द्यायची गरज होती. ते द्यायचे आम्ही प्रयत्न करत आहे. परत एकदा लोकांमध्ये जाऊन त्यांच्याशी बोलणं ही पवार साहेबांची शिकवण आहे. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत आणि निवडणुका शेवटी येत असतात जात असतात पण विचार महत्त्वाचे असतात. आम्ही विचारांसोबत राहिलो. आम्ही शरद पवारांसोबत राहिलो त्याला पण किंमत असते फक्त माझे एकट्याचा निकाल जर वेगळा असता तर मग ठीक आहे. समजून घेऊ शकलो असतो. माझ्या विरोधात राज्याचे उपमुख्यमंत्री होते. मोठी ताकत होती. सत्ता त्यांच्या हातात होती. सत्ता संस्था सर्व त्यांच्यासोबत होते. तरी पण आपण चांगली मतं मिळवली पण अख्या महाराष्ट्रामध्ये असा निकाल लागेल हे कोणालाही वाटलं नव्हतं. पण ते तसं झालं आणि हे सगळं होत असताना इतकी मतं आम्हाला मिळाली तीच आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे. आम्ही काम करत राहू लोकांमध्ये जात राहू आणि पाच वर्ष कष्ट घेत राहू आणि येणारा काळा आपलाच असेल, असा विश्वास एबीपी माझाशी बोलताना युगेंद्र पवार यांनी व्यक्त केला आहे.

# आ. कुल यांच्या मंत्रिपदासाठी बोरमलनाथाला महाभिषेक

दौंड । प्रतिनिधी

आमदार राहुल कुल यांची महायुतीमध्ये मंत्रिपदी वर्णी लागावी, यासाठी ग्रामस्थांच्या वतीने चौफुला (ता. दौंड) येथील ग्रामदैवत श्री बोरमलनाथ महाराजांना साकडे घालण्यात आले. भीमा-पाटस साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष आनंद थोरात, सरपंच बाळासाहेब सोडनवर, कैलास शेलार यांच्या उपस्थितीत श्री बोरमलनाथ महाराज मंदिरात महाभिषेक करण्यात आला.




कुल हे दौंड मतदारसंघातून सलग तिसर्यांदा आमदार झाले आहेत. त्यांनी हक्कभंग समितीचे अध्यक्षपद देखील भूषविले आहे. त्यांच्यासारख्या अभ्यासू नेतृत्वाला मंत्रिपदी संधी देण्यात यावी, अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून दौंडमधील जनता करत आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान देवेंद्र फडणवीस यांनी कुल यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, त्यांना मंत्री करतो, अशी घोषणा केली होती. कुल हे निवडून आल्याने त्यांना मंत्री करावे, अशी मागणी मतदारांनी केली आहे. याबाबत आनंद थोरात म्हणाले की, आमदार कुल यांचा पाण्याबाबत मोठा अभ्यास आहे. मुळशीचे पाणी दौंडला आणा, असे विधिमंडळात सांगणारे ते एकमेव आमदार आहेत. त्यामुळे कुल यांना जलसंपदा खाते मिळावे, अशी आमची मागणी आहे. या प्रसंगी अभिषेक थोरात, दिनेश गडधे, जालिंदर काटे, रोहिदास राजपुरे, शुभम मारकड, दत्तात्रेय गडधे, धनंजय थोरात, योगेश कोळपे, परशुराम शेळके, विकास सोडनवर आदी उपस्थित होते.

# जिल्हा युवा महोत्सव रंगणार दोन दिवस

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी, नेहरू युवा केंद्र संघटन, पुणे व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या विद्यमाने जिल्हास्तरावर युवा महोत्सवाचे दि. ५ व ६ डिसेंबर २०२४ रोजी आझम कॅम्पस येथे आयोजन करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्यावतीने दि. १२ ते १६ जानेवारी या कालावधीत दिल्ली येथे आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवात जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडूंना सहभागी होता यावे, यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.




युवा महोत्सवामध्ये संकल्पना आधारीत स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमाअंतर्गत लोकनृत्य व लोकगीत, कौशल्य विकासाअंतर्गत कथा लेखन, कविता, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, भारत यंग लीडर्स डायलॉग (पंतप्रधान यांच्यासमवेत चर्चा) व युथ आयकॉन या उपक्रमांचा समावेश आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी संबंधित शाळा, महाविद्यालये अथवा युवक-युवतींनी त्यांचे प्रवेश dsopune6gmail.com वर किंवा ९५५२९-३१११९ या व्हॉट्स प क्रमांकावर दि.३ डिसेंबर, तर विकसित भारत यंग लिडर्स डायलॉग (पंतप्रधान यांच्या समवेत चर्चा) या उपक्रमात युवा संस्थांनी सहभागी होण्याकरीता https://mybharat.gov.in/ या संकेतस्थळावर ५ डिसेंबरपर्यंत नावे नोंदवावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# वडगाव रासाई येथे भरधाव टेम्पोने मुलीला उडविले

आंधळगाव । प्रतिनिधी

वडगाव रासाई (ता. शिरूर) येथे सोमवारी (ता. २५) संध्याकाळी ८ वाजण्याच्या सुमारास भरधाव टेम्पोने रस्त्याने पायी जाणाऱ्या मुलीला उडविल्याची घटना घडली. या अपघातात मुलगी जखमी झाली आहे. याबाबत मारुती रामनाथ भंडारी (रा. वडगाव रासाई, ता.शिरूर जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी संध्याकाळी ८ वाजता त्यांची मुलगी शरयू ही त्यांच्या घरासमोरून चुलत भाऊ दिगंबर भंडारी यांच्या घराकडे रस्त्याच्या बाजूने जात होती. यावेळी समोरील बाजूने एम.एच १२ एस.एक्स १०७७ क्रमांकांचा पांढऱ्या रंगाचा टेम्पो शेलारवाडी बाजूने वडगाव रासाई गावाकडे जात होता. टेम्पो चालकाने भरधाव वेगात पायी येणाऱ्या शरयू हिला जोराची धडक दिली. यामध्ये तिच्या डाव्या पायाला दुखापत झाली आहे. पोलिसांनी अज्ञात टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# 'लाडक्या बहिणी'ला भररस्त्यात लुटले

पुणे – राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा काही भामट्यांनीही घेतला आहे. आजवर बोगस अर्ज भरुन पैसे लाटल्याच्या घटना समोर आल्या होत्या. आता मात्र प्रत्यक्षात पैसे मिळवून देतो, असे सांगत भामटे भररस्त्यात महिलांना लुटत आहेत. अशाच एका घटनेत एका ७० वर्षांच्या महिलेचे ८० हजारांचे दागिने पळवण्यात आले. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या भामट्यांपासून सावध रहाण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. माणिकबाई रायकर (७०, रा. हडपसर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार या भामट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला स्वस्त धान्य दुकानातून कुपन घेऊन घरी चालल्या होत्या. यावेळी एक व्यक्ती त्यांच्याजवळ आला, त्याने चला मावशी येथे एक साहेब लाडकी बहीण योजनेचे पैसे वाटत आहे,' असे सांगत वृद्धेला कर्मवीर भाऊसाहेब चौकात आणले.

तेथे एके ठिकाणी बसवून येथे बसा. साहेब पाच हजार घेऊन येतील' असे सांगितले. यानंतर आरोपी तेथून निघून गेला. वृद्ध महिला बराच वेळ वाट पाहून घरी निघून आल्या. घरी आल्यावर त्यांच्या लक्षात आले, की त्यांचे मंगळसूत्र आणि अंगठी कोणीतरी काढून घेतली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार दीपक कांबळे करत आहेत.

पोलीस असल्याचे सांगत दागिने लांबवले

पोलीस असल्याचे सांगतरस्त्यावर किरकोळ वस्तूंची विक्री करणाऱ्याला भामट्याने लुटले. तुळशीबाग-मंडई रस्त्यावर ही घटना घडली. या प्रकरणी काळुराम वाडकर (५५, रा.फुरसुंगी) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. काळुराम हे वाहनातून वस्तू उतरवत होते.

तेव्हा पोलीस असल्याचा बहाणा करुन एक भामटा तेथे आला. त्याने रस्त्यावरील लोकांचे दागिने लुटले जात आहेत, गळ्यातील चेनस्कुटरच्या डिक्कीत ठेवा असे सांगितले. त्यावर काळुराम यांनी सोन्याची चेन आणि अंगठी एका बटव्यात घालून पिशवीत ठेवली . यानंतर भामट्याने ते दागिने नीट ठेवली आहे का? हे पाहण्याचा बहाणा करत ती काढून घेतली. तपास पोलीस उपनिरीक्षक नरवडे करत आहेत.

# शासनाच्या निर्णयास महापालिकेचा विरोध ?

पुणे – समाविष्ट झालेल्या ३२ गावांना ग्रामपंचायतीच्या दुप्पट दराने कर आकारणी करणे संयुक्तिक होणार नाही, अशी भूमिका महापालिका प्रशासनाने घेतली आहे. या गावांचा कर कमी केल्यास १९९७ आणि २०११ मध्ये मध्ये महापालिकेत आलेल्या इतर २४ गावांतील नागरिकांवर ही अन्याय करणारी बाब असेल. या निर्णयामुळे महापालिकेचेही कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे शासनाने याचा फेरविचार करावा, अशी मागणी केली जाणार असल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली.



समाविष्ट ३२ गावांमधील मालमत्तांना महापालिकेने केलेल्या मिळकतकर आकारणीवर राज्य सरकारने बंधने आणली आहेत. शासनाने २०१७ मध्ये ११, तर २०२१ मध्ये २३ गावे पालिकेत समाविष्ट केली. त्यानंतर महापालिकेने या गावांमध्ये अनुक्रमे २०१८ आणि २०२२ पासून पालिकेच्या दराने कर आकारणीस सुरूवात केली. याला ग्रामस्थांचा मोठा विरोध होता. तसेच कर कमी करण्यासाठी शासनाकडे वारंवार मागणी केली जात होती.

दरम्यान, २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या ११ गावांच्या करआकारणीसंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २४ जुलैला बैठक घेतली होती. उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही महापालिकेतून वगळल्यामुळे उर्वरित नऊ गावांमधील करआकारणीस या बैठकीत स्थगिती देण्यात आली. ही स्थिती अद्यापही कायम असतानाच विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी शासनाने उर्वरित गावांचाही त्यात समावेश केला आहे.

असे आहेत शासनाचे आदेश

शासनाने महापालिकेस दिलेल्या आदेशानुसार ही गावे ग्रामपंचायतीत असताना त्या वेळी झालेल्या करआकारणीच्या दुप्पट दराने महापालिकेने आकारणी करावी. तसेच कराची रक्कमही दुपटीपेक्षा अधिक असता कामा नये.' या शिवाय या आदेशांनुसार करआकारणीचे पुनर्विलोकन होईपर्यंत करवसुलीस स्थगिती देण्यात आली असल्याचे महापालिकेस कळविले आहे. त्यानंतर महापालिकेकडून या सर्व ३२ गावांमधील मिळकतकर वसुली थांबविली असून महापालिकेस त्याचा मोठा आर्थिक फटका बसला आहे.


काय आहे महापालिकेची भूमिका ?

३२ गावांच्या समावेशानंतर महापालिकेच्या मिळकतींची संख्या सुमारे अडीच ते तीन लाखांनी वाढली आहे. या गावांमधे असलेला ग्रामपंचायतीचा कर अत्यल्प आहे. त्याच वेळी महापालिकेचा कर अधिक असला, तरी या गावांना तो पहिल्याच वर्षी न लावता, दुसऱ्या वर्षापासून प्रत्येक वर्षी २० टक्के प्रमाणे आकारला जातो. तर प्रत्यक्षात ५ वर्षांनी तो १०० टक्के आकारला जातो. मात्र, आता ३२ गावांना ग्रामपंचायतीच्या दराने आकारणी केल्यास या पूर्वी समाविष्ट झालेली गावे तसेच शहरातील इतर मिळकतींच्या आकारणीत तफावत होईल व एकाच शहरात दोन वेगवेगळ्या करआकारणी होतील, ही बाब इतर मिळकतधारकांवर अन्यायकारक असल्याने शासनाकडे ही बाब मांडण्यात येणार आहे.

# शांतता... पुणेकर वाचत आहेत' ; पुणेकर एक तास वाचनात होणार रममाण

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे दि. १४ ते २२ डिसेंबर या दरम्यान पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. यात शांतता पुणेकर वाचत आहेत' या अनोख्या उपक्रमाचे दि. ११ डिसेंबर रोजी दुपारी १२ ते १ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. वाचनसंस्कृती बळकट करणारी या चळवळीत तथा उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन संयोजक राजेश पांडे यांनी रविवारी केले.




या वेळी प्राचार्य संजय चाकणे आणि आनंद काटीकर उपस्थित होते. पांडे म्हणाले, या उपक्रमाला मागील वर्षी प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावर्षी देखील हजारोंच्या संख्येने पुणेकर यामध्ये सहभागी होतील, यादृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत. पुणे शहरातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सगळ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे.

पुणे शहरातील सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा आणि अन्य शैक्षणिक संस्था या सर्वांना यामध्ये सामावून घेण्यात येणार आहे. तसेच पुणे शहरातील सर्व रुग्णालये, सार्वजनिक गणेश मंडळे, ग्रंथालये, सर्व शासकीय कार्यालये, खासगी आणि सरकारी आस्थापने तसेच पुणे शहरातील सर्व मोठे चौक, कलाकार कट्टा, पर्वती, शनिवार वाडा, सारसबाग यासह पुणे शहरातील सर्व ऐतिहासिक स्थळांवर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

येथे करा नाव नोंदणी !

या उपक्रमात कुठे आणि कोणते पुस्तक वाचले याची माहिती पाठविण्यासाठी https://pbf24.in/register ही लिंक आणि क्यूआर कोड देण्यात आले आहे. यावर माहिती पाठविणाऱ्यांना शांतता पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे पांडे यांनी सांगितले.


# 'या' प्रवाशांच्या पिकअपसाठी कॅबला परवानगी

**पुणे । प्रतिनिधी**

विमानतळाच्या नवीन टर्मिनलवर कॅबला पिकअपसाठी परवानगी नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर दिव्यांग, गर्भवती, एकटी महिला अथवा ज्येष्ठ नागरिक असतील तर त्यांना घेण्यासाठी कॅबला विमानतळ प्रशासनाने परवानगी दिली आहे. ही सेवा प्रवाशांना मोबाइल पवर देखील उपलब्ध होणार आहे.

एरोमॉल प्रशासनाने या संदर्भात कॅबची सेवा देणाऱ्या कंपनीशी बोलणी केली असून लवकरच संबंधित कंपनी आपल्या यंत्रणेत आवश्यक ते बदल करणार आहे. त्यानंतर लवकरच प्रवाशांना कॅब आरक्षित करतानाच त्यांना पिकअपचा पर्याय उपलब्ध होणार असल्याने प्रवाशांची गैरसोय टळणार आहे.

टर्मिनलच्या आवारात वाहनांची गर्दी होऊन त्याचा त्रास प्रवाशांना होऊ नये याकरिता विमानतळ प्रशासनाने जुन्या व नवीन टर्मिनलवर कॅबला पिकअपसाठी परवानगी दिलेली नाही. यामुळे ज्येष्ठ तसेच दिव्यांग प्रवाशांसह महिलांची गैरसोय होत होती. परंतु. सदर बाब निदर्शनास येताच यातून गर्भवती, एकटी महिला, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना वगळले असून काही दिवसांपूर्वीच अशा प्रवशांना घेण्यासाठी कॅबला परवानगी देण्यात आली आहे.



मात्र, त्यासाठी त्यांना नवीन टर्मिनलवरच्या उपलब्ध काउंटरवर जावे लागत होते. परंतु, आता प्रवाशांना पवरच पिकअपची सेवा उपलब्ध होणार आहे. विमानतळ प्रशासनाने नवीन टर्मिनलवर दोन ई-बस उपलब्ध केलेल्या आहेत. यातून टी २ ते एरोमॉल येथे प्रवाशांना मोफत नेण्यात येते. एरोमॉलमधून प्रवाशांना कॅब उपलब्ध होते. दोन्ही बसच्या माध्यमातून दररोज सुमारे तीन हजार प्रवाशांची वाहतूक होते. प्रवाशांच्या सोयीसाठी नऊ गोल्फ कार्टसुद्धा उपलब्ध आहेत. यातून देखील काही प्रवाशांची वाहतूक केली जाते.दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक तसेच गर्भवती यांच्या सोयीसाठी कॅबला पिकअपसाठी परवानगी दिलेली आहे. मात्र, त्यासाठी त्यांना काउंटरवर येऊन माहिती देणे अनिवार्य होते. आता, अशा प्रवाशांना मोबाइलवरच कॅब आरक्षित करताना पिकअपचा पर्याय दिला जाणार आहे. त्यासाठी संबंधित कंपनी पमध्ये आवश्यक ते बदल करीत आहे. लवकरच ही सुविधा प्रवाशांसाठी उपलब्ध होईल. – व्ही. रजपूत, उपाध्यक्ष, एरोमॉल, पुणे विमानतळ.

एरोमॉलमध्ये प्रवासी वाहतूक

कॅबची दैनंदिन ये-जा : १२ हजार वेळा

दैनंदिन प्रवासी वाहतूक : ९ हजार

प्रवाशांकडून सेवेचा वापर : ३० टक्के

# शिक्रापूरचे माजी उपसरपंच दत्तात्रय गिलबिले यांची हत्या

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

शिक्रापूरचे माजी उपसरपंच व शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा सल्लागार दत्तात्रय बंडू गिलबिले (वय ५१) यांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही घटना रविवारी (दि. १) दुपारी सव्वा बाराच्या सुमारास घडली.



गिलबिले यांच्या हत्येची बातमी समजताच शिक्रापूरमध्ये मोठी खळबळ उडाली. मालमत्ता अथवा अनैतिक संबंधाच्या कारणांमधून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती शिक्रापूर पोलिसांनी दिली आहे. हल्लेखोर यांची नावे व संख्या निष्पन्न झाली नसून पोलीस पथक त्यांच्या मागावर असल्याची माहिती पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी दिली.

दत्तात्रय गिलबिले हे दुपारच्या वेळेस आपल्या बंगल्याच्या आवारात खुर्चीवर बसलेले असताना आरोपींनी धारदार शास्त्राने त्यांच्या मानेवर वार केले. यानंतर त्यांना पुणे येथे खासगी रुग्णालयात नेत असताना त्यांचा मृत्यू झाला.

# कंटेनरच्या धडकेत कारमधील चौघे जखमी

पुणे – कंटेनरच्या धडकेत कारमधीतील चौघे जण जखमी झाल्याची घटना पुणे-सातारा महामार्गावर देगाव फाटा परिसरात शनिवारी घडली. अपघातात साडेतीन वर्षांच्या बालिकेसह चौघेजण जखमी झाले. अपघातग्रस्त कंटेनर आणि कार क्रेनच्या सहायाने बाजूला काढल्यानंतर या भागातील वाहतूक सुरळीत झाली.

सर्जेराव सखाराम पाटील ( ६०), बायक्का सर्जेराव पाटील ( ५०), प्रवीण सखाराम पाटील ( ३५), इरा प्रवीण पाटील ( साडेतीन, सर्व रा. दरेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. अपघातात सर्जेराव पाटील, त्यांची पत्नी बायक्का हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर नसरापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती राजगड पोलिसांनी दिली. पाटील कुटुंबीय मुंबईहून कारमधून कोल्हापूरला निघाले होते. शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास पुणे-सातारा महामार्गावर देगाव फाटा परिसरात चेलाडी उड्डाणपुलाजवळ पाठीमागून येणाऱ्या कंटेनरने कारला धडक दिली. कंटेनरचालकाचे नियंत्रण सुटल्याने पुलाजवळ अडकला. अपघाताची माहिती मिळताच राजगड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. कारमध्ये अडकलेल्या चौघांना बाहेर काढले. त्यांना तातडीने नसरापूर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. अपघातानंतर वरवे ते देगाव फाटा परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली. या भागात तीन ते चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी क्रेन मागविली. अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहायाने बाजूला काढल्यानंतर या भागातील वाहतूक सुरळीत झाली.